CMYK




# पार्श्वभूमी




बीड वर्ष ३६ वे अंक ८३ वा फोन २३०१०१ दिनांक २० फेब्रुवारी २०२६ शुक्रवार
गंमत भंडारी
ई-पेपर : www.parshvbhumi.com
Reg.No.L/85/RNP/Beed/2020-22 RNI Regd.no. MAHMAR/1990/501
पाने ६ किंमत ४रु.

# धनंजय मुंडेंवर १७ लाख रु.घेतल्याचा महिलेचा आरोप

# खरंच अन्याय झालाय तर मग ५ वर्ष गप्प का होतात?

बीड दि.१९ (प्रतिनिधी):- पोलीस खात्यातील बडतर्फ पतीला पुन्हा नोकरीत रुजू करुन घेण्यासाठी धनंजय मुंडे यांनी पैशाची मागणी करत १७ लाख रुपये घेतल्याचा आरोप रंजना नागपूरकर यांनी केला आहे. सदर महिलेवर अन्याय झाला आहे हे खरं आहे परंतु ५ वर्ष त्या गप्प का राहिल्या ? असा प्रश्न उपस्थित होत आहे. सदर महिलेने आर्थिक फसवणुकीचा आरोप करत हे पैसे निखील फड आणि कैलास फड यांच्या उपस्थितीत दिल्याचे म्हटले आहे. या आरोपांमुळे धनंजय मुंडे पुन्हा एकदा अडचणीत आले आहेत.



## कदम यांनीही पैसे घेतले तर मग एकट्या धनंजय मुंडेंच्या नावाने ओरड का ?

तक्रारदार महिला रंजना नागपूरकर यांचे पती नोकरीत असतांना १९९७ मध्ये त्यांना बडतर्फ करण्यात आले. त्यानंतर पुन्हा रुजू करुन घेण्यासाठी गृह विभागातील कक्ष अधिकारी ऋषिकेश कदम यांनीही पैसे घेतले मात्र पतीला पुन्हा रुजू करुन घेण्यात आले नाही. वेळोवेळी तक्रारी, निवेदने दिली परंतु त्याचा काही उपयोग झाला नाही, त्यानंतर पतीचे निधन झाले त्यामुळे मी आता पैसे परत मागत आहे परंतु मला पैसे परत दिले जात नसल्याचे सदर महिलेचे म्हणने आहे. कदम यांनीही पैसे घेतले, मग एकट्या धनंजय मुंडेंचेच नाव का ? असा देखील प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे.

## धनंजय मुंडे यांच्या समोरच मला पिस्तुल लावले -नागपूरकर

रंजना नागपूरकर यांनी केवळ पैशाची फसवणूक झाल्याचा आरोपच केला नाही तर धमकी दिल्याचा दावाही केला आहे. १७ लाख रुपये देऊनही आपले काम झाले नाही त्यातच पतीचे निधन झाले. तेंव्हा पैसे परत मागण्यासाठी मी परळीत गेले होते तेंव्हा धनंजय मुंडे यांच्यासमोर मला धमकाविण्यात आले. त्यांच्यासमोरच मला पिस्तुल लावून धमकी दिली असा आरोप त्यांनी केला असून तिथून मला हाकलून देण्यात आले असे रंजना नागपूरकर म्हणाल्या.

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आ.धनंजय मुंडे यांच्या अडचणी पुन्हा एकदा वाढल्या आहेत. दोनच दिवसापुर्वी मनोज जरांगे पाटील यांनी याच महिलेच्या संदर्भात सुतोवाच केल्यानंतर आता रंजना नागपूरकर या महिलेने धनंजय मुंडे यांच्यावर आर्थिक फसवणूक करणे व जीवे मारण्याचा धमकी दिल्याचा आरोप केल्याने खळबळ माजली आहे. प्रसारमाध्यमांशी बोलतांना त्या म्हणाल्या, पतीला पुन्हा नोकरीत रुजू करुन घेण्यासाठी

पान २ वर

## आम्ही त्या महिलेस ओळखतही नाही, कोणत्याही चौकशीस तयार

### फड पिता-पुत्राचे आव्हान

- लोकेशन कॉल डिटेल्स सगळे काढा, आमच्या व नागपूरच्या महिलेचा काहीही संबंध नाही ; कैलास फड व निखिल फड यांची पोलिसांना चौकशीची विनंती
- जातीमुळे सॉफ्ट टार्गेट, आम्हाला व आमच्या आडून धनंजय मुंडे यांना बदनाम करण्यासाठी कारस्थान - निखिल फड
- रंजना नागपूरकर यांचे आरोप फड पिता पुत्रांनी फेटाळले ; कधीही भेट किंवा ओळख नसल्याचा निर्वाळा

नागपूर येथील रंजना नागपूरकर नामक महिलेने आर्थिक गैरव्यवहाराचे आरोप केल्यानंतर परळीतील कैलास व निखिल फड या पिता पुत्रांनी स्वतःहून माध्यमांच्या समोर येत संबंधित महिलेचे आरोप फेटाळून लावले आहेत. सदरील महिलेला आपण ओळखत नाही, कधीही भेटलेलो नाही, कोणत्याही प्रकारे आपली व त्यांची भेट किंवा संवाद झालेला नाही, तरीही त्या आर्थिक गैरव्यवहार आणि बंदूक दाखवून धमकी दिल्याचा करत असलेला आरोप संपूर्णतः खोटा व तथ्यहीन असून, आपण मागील दहा वर्षात कधी नागपूरला गेलो सुद्धा नाहीत. त्याचबरोबर संबंधित महिलेने सांगितलेला घटनाक्रम, त्यातील स्थळे व तारखा पाहून त्यांचे व आमचे कॉल डिटेल्स व मोबाईल लोकेशन काढावेत, संबंधित प्रकरणाचा व आमचा किंवा आ. श्री. धनंजय मुंडे यांचा कुठलाही संबंध नाही, किंवा कोणत्याही प्रकारच्या चौकशीसाठी आपण तयार असून,

पान २ वर

## छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करण्यासाठी शिवप्रेमींची गर्दी







बीड दि.१९ (प्रतिनिधी):- हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमीत्त गुरुवारी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यासाठी शिवप्रेमींनी प्रचंड गर्दी केली होती. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी सकाळी ७ वाजता प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन शासकीय महापूजन करुन अभिवादन केले. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान, पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.सतीशकुमार सोळुंके, नगर पालिकेचे मुख्याधिकारी शैलेश फडसे, तहसिलदार चंद्रकांत शेळके, आ.संदीप क्षीरसागर उपस्थित होते.डॉ.योगेश क्षीरसागर यांच्यासह त्यांच्या सहकाऱ्यांनीही अभिवादन केले. आ.विजयसिंह पंडित, नगराध्यक्षा प्रेमलताताई पारवे, उपनगराध्यक्ष विनोद मुळूक, गटनेते फारुक पटेल, अमर नाईकवाडे, सभापती शेख निजाम, कल्याण आखाडे, दिलीप गोरे, सी.ए.जाधव, झुंजार धांडे, बळीराम गवते, संदीप आदमाने आदींनी छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन केले. गुरुवारी सकाळपासूनच बीड शहर आणि परिसरातील शिवप्रेमींनी महाराजांना अभिवादन करण्यासाठी मोठी गर्दी केली होती. जयभवानी जयशिवाजी अशा घोषणांनी बीड शहर दणाणून गेले होते.

### बीड नगर पालिकेने ५ कोटींची थकबाकी न भरल्याने

## पाटबंधारे विभागाने बिंदुसरे जवळील पाणी पुरवठ्याच्या वॉल्वला सील ठोकले

बीड दि.१९ (प्रतिनिधी):- बीड नगर पालिकेकडे पाणी पट्टीचे तब्बल ५ कोटी रुपये थकले आहेत. आठवडाभरापुर्वी नोटीस देऊनही पालिकेने कसलीच दखल न घेतल्याने दि.१८ फेब्रुवारी रोजी पाटबंधारे विभागाने बिंदुसरा परियोजना जवळील नगर पालिकेच्या पाणी पुरवठा वॉल्वला सील ठोकले आहे. या कारवाईने खळबळ उडाली असून आधीच लिकेज दुरुस्तीच्या कामामुळे शहराचा पाणी पुरवठा चार दिवस लांबणीवर पडला होता, त्यात आता वॉल्वला सील ठोकल्याने पाणी पुरवठा विस्कळीत होण्याची भीती व्यक्त होत आहे.



बीडच्या पाटबंधारे विभागाची ५ कोटी रुपयांची थकबाकी नगर पालिकेकडे आहे. गेल्या अनेक वर्षापासून ही थकबाकी नगर पालिकेने भरलेली नाही. नगर परिषदेकडे जानेवारी २०२६ अखेर तब्बल ४९७.२७लाख रुपयांची पाणीपट्टी थकीत असल्याचे स्पष्ट झाल्याने पाटबंधारे विभागाने दि.११ फेब्रुवारी रोजी बीड नगर पालिकेला थकीत रक्कम तात्काळ जमा करा असे पत्र देण्यात आले होते. मात्र नगर पालिकेने

पान २ वर

### पाटबंधारे विभाग आतापर्यंत झोपा काढत होतं का ?

पाणी पुरवठा ही अत्यावश्यक बाब आहे. अशा परिस्थितीत ७ दिवसापुर्वी नोटीस दिल्याचे सांगायचे आणि लगेच १८ फेब्रुवारीला सील ठोकायचे हा प्रकार गंभीर म्हणावा लागेल. पाटबंधारे विभाग आतापर्यंत झोपा काढत होता का ? ५ कोटींची थकबाकी होईपर्यंत पाटबंधारे विभागाने केवळ बघ्याची भूमिका का घेतली ? नेमकी आताच त्यांना ५ कोटींची आठवण का झाली ? दरम्यान या मागे राजकारण असण्याचा संशय असून जाणीवपुर्वक सत्ताधाऱ्यांना अडचणीत आणण्याचा प्रयत्न असल्याची चर्चा आहे.

### सेवा ज्येष्ठता डावलून आणि प्रकरण न्यायप्रविष्ट असतांनाही खटाटोप

## बीडच्या शिक्षण विभागाला केंद्र प्रमुख पदोन्नतीच्या प्रक्रियेची घाई का झाली?

बीड दि.१९ (प्रतिनिधी):- बीड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाने सर्व प्रकारच्या सेवा ज्येष्ठता डावलून चार वर्ष जाणीवपुर्वक पूर्ण न केलेली केंद्रप्रमुख पदोन्नतीची प्रक्रिया राबविण्याची घाई सुरु केली आहे. प्रकरण न्यायप्रविष्ट असतांनाही यामध्ये शिक्षण विभागाला एवढा इंटरेस्ट का ? असा प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे. या पदोन्नती प्रक्रियेच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर आर्थिक उलाढाल होण्याची शक्यताही आहे. त्याच अनुषंगाने प्रकरण न्यायप्रविष्ट असतांनाही पदोन्नतीचा खटोटोप सुरु असल्याची चर्चा होऊ लागली आहे.

बीड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाने दोन दिवसापुर्वी केंद्रप्रमुख पदोन्नतीच्या प्रक्रियेतील कागदपत्र पडताळणीचा पहिला टप्पा पूर्ण केला. ही प्रक्रिया याच पद्धतीने पूर्ण करण्याचा खटाटोप शिक्षण विभागातील काही जणांनी घातला आहे.

पान २ वर

### शिक्षण विभागातील त्या अधिकाऱ्याचा इंटरेस्ट काय ?

बीड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागात एका ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकाऱ्याकडून केंद्रप्रमुख पदोन्नतीची प्रक्रिया घाईघाईत घेण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत. वरिष्ठ अधिकाऱ्यांना विश्वासात घेऊन तोच अधिकारी ही प्रक्रिया पूर्ण व्हावी यासाठी आग्रह करत असल्याची माहिती समोर आली आहे. संबंधीत अधिकाऱ्याचा मुलगा या प्रक्रियेत असल्याचेही सांगण्यात येत आहे. त्यामुळेच ही प्रक्रिया घाईगडबडीत घेण्याचा घाट घातला जात असल्याची चर्चा होऊ लागली आहे.

## बोरफडी येथे आज सुप्रसिद्ध अभिनेत्री रिंकू राजगुरू येणार

बीड दि.१९ (प्रतिनिधी):- गावांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि विकसित महाराष्ट्र घडविण्याच्या उद्देशाने राबविण्यात



येत असलेल्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत प्रचार व प्रसिद्धीसाठी मराठी चित्रपटसृष्टीतील सुप्रसिद्ध अभिनेत्री रिंकू राजगुरू आज (दि.२०) सकाळी १० वाजता बीड तालुक्यातील बोरफडी येथे भेट देणार आहेत. या कार्यक्रमाचे आयोजन बोरफडी ग्रामपंचायतीच्या वतीने करण्यात आले असून नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सरपंच कैलास घुगे आणि ग्रामपंचायत सदस्यांनी केले आहे.

पान २ वर

### अजित पवार विमान अपघात

## ब्लॅकबॉक्समधी डेटा मिळविण्यासाठी भारत अमेरिकेची मदत घेणार



नवी दिल्ली दि.१९ (वृत्तसेवा):- माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघात चौकशीला आता वेगळे वळण लागले आहे. विमान अपघात चौकशी संस्था एएआयबीने मंगळवारी सांगितले की, लिअरजेट ४५ विमानाच्या कॉकपिट व्हॉइस रेकॉर्डर (सीव्हीआर) मधून डेटा मिळवण्यासाठी अमेरिकेकडे विशेष मदत मागितली आहे.एएआयबीने अधिकृत निवेदनात म्हटले आहे की,

पान २ वर




### नवी भाजी मंडईतील पाण्याची टाकी दुरुस्त करण्याची मागणी

बीड दि.१९ (प्रतिनिधी):- नव्या भाजी मंडईत भाजी विक्रेत्यांसाठी १०-१५ वर्षापुर्वी पाण्याची टाकी बांधण्यात आली आहे. परंतु ती सध्या दुरुस्तीमुळे बंद आहे. या टाकीचा उपयोग भाजी विक्रेत्यांना भाजी धुण्यासाठी व पिण्याच्या पाण्यासाठी होत होता. तरी ही टाकी दुरुस्त करावी अशी मागणी होत आहे.




## माजलगावच्या शिवजन्मोत्सवात २२ जोडपे विवाहबद्ध





- शिवजन्मोत्सव समितीचा पुढाकार
- नवरदेव-नवरींची स्कार्पिओ गाड्यांमधून मिरवणूक
- रेखाताई होकेंनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित केलेले नाटक सादरीकरणाने मने जिंकली



माजलगाव दि.१९ (प्रतिनिधी):- येथील शिव सेवा भावी समितीच्या वतीने शिवजन्मोत्सव निमित्त आयोजित करण्यात आलेल्या सामूहिक विवाह सोहळ्यामध्ये दि. १९ फेब्रुवारी गुरुवार रोजी २२ जोडपे विवाहबद्ध झाले. नवरदेव नवरीची मुख्य रस्त्यावरून स्कार्पिओ गाड्यातून बँड च्या वाद्यांमध्ये मिरवणूक काढण्यात आली होती या देखण्या विवाह सोहळ्यास हजारोंच्या संख्येने नागरिकांची उपस्थिती होती.

या विवाह सोहळ्यासाठी आमदार प्रकाश सोळंके, आयुष्यमान भारतचे प्रमुख ओमप्रकाश शेटे, बहुजन नेते बाबुराव पोटभरे, जयसिंग सोळंके, गौतम खटोड, उपनगराध्यक्ष सहल चाऊस, संपादक विजयराज बंब, शिवाजी रांजवण ,नारायण डक, सुरेंद्र रेदासनी, पारसनाथ जैयस्वाल, यांची प्रमुख उपस्थिती होती.शिव सेवाभावी समितीचे प्रमुख बाळु ताकट यांचे वतीने आयोजन करण्यात येते. यात सर्वधर्मिय सामुहिक विवाह सोहळ्यात आतापर्यंत सहाशे पेक्षा अधिक जोडप्यांचे संसार सुखाचे झाले असुन यातुन गरजु, गरिब

पान २ वर

CMYK

# रमजान

## संयम , श्रद्धा आणि करुणेचा पवित्र महिना

रमजान हा इस्लाम धर्मातील सर्वात पवित्र आणि आध्यात्मिक दृष्ट्या महत्वाचा महिना मानला जातो. हा महिना केवळ उपवासाचा नसून आत्मशुद्धी , संयम , प्रार्थना , दानधर्म आणि समाजबंध दृढ करण्याचा कालखंड आहे . इस्लामी कालगणनेनुसार रमजान हा नववा महिना असून तो चंद्रदर्शनानुसार सुरू होणारा आहे . चंद्राच्या दर्शनाने सुरू होणारा आणि ईद-उल-फितर या आनंदोत्सवाने संपणारा हा महिना मुस्लिम समाजासाठी अत्यंत पवित्र मानला जातो .रमजान म्हणजे केवळ अन्न-पाण्याचा त्याग नव्हे , तर मन , वाणी आणि आचरण शुद्ध करण्याची एक आध्यात्मिक साधना आहे . हा महिना मानवाला संयम , सहनशीलता आणि दयाळूपणाची शिकवण देतो . सब्र का फल मीठा होता है ही म्हण रमजानच्या जीवनतत्त्वाशी जुळणारी आहे . उपवासाच्या माध्यमातून मनुष्य स्वतःवर नियंत्रण ठेवायला शिकतो आणि दुसऱ्यांच्या वेदना समजून घेण्याची संवेदनशीलता विकसित करतो .

रमजानचा ऐतिहासिक व धार्मिक संदर्भ : इस्लामी परंपरेनुसार पवित्र कुराणचा अवतार रमजान महिन्यात झाला . पैगंबर मोहम्मद यांना देवदूत जिब्राईल यांच्या माध्यमातून अल्लाहचा संदेश मिळाला , अशी श्रद्धा आहे . त्यामुळे रमजान हा कुराणचा महिना म्हणूनही ओळखला जातो . या महिन्यात कुराणचे पठण , अभ्यास आणि चिंतन करण्यास विशेष महत्व दिले जाते.

इस्लाम धर्मातील पाच मूलभूत स्तंभांपैकी रोजा हा एक महत्वाचा स्तंभ आहे . श्रद्धा , नमाज , रोजा , जकात आणि हज हे इस्लामचे पाच आधारस्तंभ मानले जातात . त्यातील रोजा हा आत्मसंयमाचा सर्वोच्च अभ्यास मानला जातो.

रोजा : उपवासाची आध्यात्मिक साधना - रमजान महिन्यात मुस्लिम बांधव सूर्योदयापूर्वी सहरी करून दिवसभर अन्न-पाणी त्याग करून उपवास करतात . सूर्यास्तानंतर इफ्तार करून रोजा सोडला जातो . या काळात केवळ अन्नाचा त्याग केला जात नाही , तर वाईट विचार , कटु वाणी , राग , मत्सर आणि चुकीच्या कृतींपासून दूर राहण्याचा प्रयत्न केला जातो . रोजा हा केवळ धार्मिक विधी नसून आत्मनियंत्रणाचा कठोर अभ्यास आहे . उपवासामुळे मनुष्याला भूक आणि तहान यांची जाणीव होते आणि त्यामुळे गरीब व गरजू लोकांच्या वेदना समजण्याची संवेदना निर्माण होते . म्हणूनच रमजान हा करुणा आणि दानधर्माचा महिना मानला जातो . भुकेल्या पोटी भजन नाही ही म्हण मानवाच्या मूलभूत गरजांची जाणीव करून देते . रमजानमध्ये हीच जाणीव अधिक तीव्र होते आणि त्यामुळे समाजातील दुर्बल घटकांसाठी मदतीचा हात पुढे केला जातो.

सहरी आणि इफ्तार : दिवसाची दोन पवित्र क्षणे : - रमजानच्या प्रत्येक दिवसाची सुरुवात सहरीने होते . पहाटे सूर्योदयापूर्वी घेतलेले हे अन्न दिवसभराच्या उपवासासाठी ऊर्जा देणारे असते . सहरी केवळ अन्न घेण्याचा विधी नसून प्रार्थना आणि आत्मस्मरणाचा काळ मानला जातो . सूर्यास्तानंतर इफ्तार करून रोजा सोडला जातो . खजूर आणि पाण्याने रोजा सोडण्याची परंपरा आहे . इफ्तार हा आनंद आणि सामूहिकतेचा क्षण असतो . कुटुंबीय , नातेवाईक , मित्र आणि समाजातील लोक एकत्र येऊन इफ्तार करतात . अनेक ठिकाणी सार्वजनिक इफ्तारचे आयोजन केले जाते , ज्यातून सामाजिक एकात्मतेचा संदेश दिला जातो.

जकात आणि सदका : दानधर्माची परंपरा - रमजानमध्ये जकात देण्यास विशेष महत्व आहे . जकात म्हणजे आपल्या संपत्तीतील ठराविक भाग गरजू लोकांना देणे . ही केवळ दानाची कृती नसून सामाजिक न्यायाची संकल्पना आहे . समाजातील संपत्तीचे संतुलित वाटप होण्यासाठी जकात महत्वाची मानली जाते . याशिवाय सदका म्हणजे स्वेच्छेने दिलेले दानही रमजानमध्ये मोठ्या प्रमाणात केले जाते . गरीब , अनाथ , विधवा , आजारी आणि गरजू लोकांना मदत करण्याची परंपरा या महिन्यात विशेष दिसून येते . दान दिल्याने धन कमी होत नाही , तर पुण्य वाढते ही भावना या काळात प्रत्यक्ष अनुभवता येते.

तरावीह नमाज आणि कुराण पठण : - रमजान महिन्यात रात्री विशेष नमाज अदा केली जाते , तिला तरावीह नमाज म्हणतात . या नमाजमध्ये कुराणचे पठण केले जाते . अनेक ठिकाणी महिनाभरात संपूर्ण कुराण पठण पूर्ण करण्याची परंपरा आहे . मशीदींमध्ये रात्री उशिरापर्यंत नमाज आणि प्रार्थना सुरू असतात . या काळात धार्मिक वातावरण अधिक पवित्र आणि आध्यात्मिक बनते . श्रद्धाळू लोक कुराणचे अध्ययन करून त्यातील शिकवणी आचरणात आणण्याचा प्रयत्न करतात .

शब-ए-कद्र : हजार महिन्यांपेक्षा श्रेष्ठ रात्र : - रमजानच्या शेवटच्या दहा दिवसांत येणारी शब-ए-कद्र ही रात्र अत्यंत पवित्र मानली जाते . या रात्री कुराणचा अवतार झाल्याची श्रद्धा आहे . इस्लामी परंपरेनुसार ही रात्र हजार महिन्यांपेक्षा अधिक पुण्य देणारी मानली जाते . या दिवशी श्रद्धाळू लोक संपूर्ण रात्र प्रार्थना , कुराण पठण आणि ध्यानधारणा करतात . मनापासून केलेल्या प्रार्थना या दिवशी स्वीकारल्या जातात , अशी श्रद्धा आहे .

उर्वरीत उद्याच्या अंकी

**चंद्रकांत सरस्वती**
**प्रकाश शेळके**
**तहसीलदार , बीड.**

पान १ वरून

## धनंजय मुंडेंवर १७ लाख रुपये घेतल्याचा आरोप

धनंजय मुंडे यांनी पैशाची मागणी केली होती. धनंजय मुंडे यांना १७लाख रुपये दिल्याचा दावा नागपूरकर यांनी केला आहे. परळीतील त्यांच्या निवासस्थानी मी गेले होते, तेथे पैसे दिले असे सदर महिलेचे म्हणने आहे. पैसे देऊनही काम झाले नाही, त्यात पतीचे निधन झाले तेंव्हा पैसे परत मागण्यासाठी गेले तेंव्हा मला धमक्या देण्यात आल्या. निखील फड आणि कैलास फड यांनी धमक्या दिल्याचे सदर महिलेने म्हटले आहे.

## आम्ही त्या महिलेस ओळखतही नाहीत

चौकशीत दोषी आढळलो, तर द्याल ती शिक्षा भोगायला तयार आहे, असे आवाहन परळीतील फड पिता पुत्रांनी केले आहे.

माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांच्या सह काही आजी - माजी मंत्री व पुढाऱ्यांचे नाव घेऊन पोलिस कर्मचारी असलेल्या आपल्या पतीला पोलिस चौकशीपासून वाचवण्यासाठी आपण मंत्रालयातील काही अधिकारी, माजी मंत्री तसेच फड पिता पुत्रांसह अनेकांची नावे रंजना नागपूरकर यांनी घेतली होती.

तसेच आपली फसवणूक झाली असून पैसे परत मागायला गेले असता फड पिता पुत्रांनी आपल्याला बंदूक दाखवून भीती घातली व जीवे मारण्याची धमकी देऊन हाकलून दिले, असाही आरोप केला होता. मात्र फड पिता पुत्रांनी हे आरोप फेटाळून लावत वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी याबाबत सखोल चौकशी करण्याचे आवाहन केले आहे.

सदर महिला रंजना नागपूरकर यांची आपली ओळख नाही, कधीही भेट किंवा संवाद झालेला नाही, मग आम्ही बंदूक कधी दाखवली ? त्या जो घटनाक्रम आणि तारखा सांगत आहेत, त्याप्रमाणे वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी चौकशी करून आमचे कॉल डिटेल्स, लोकेशन सर्व काढावेत, आमचा दोष आढळला तर आम्ही द्याल ती शिक्षा भोगू, असे म्हणत फड पिता पुत्रांनी आपल्याला व आपल्या आडून धनंजय मुंडे यांना सॉफ्ट टार्गेट केल्याचा गंभीर आरोप केला आहे.

तर अब्रु नुकसानीचा दावा ठोकणार

दरम्यान एका विशिष्ट जातीचे असल्याने मागील काही दिवसांपासून आम्हाला सतत टार्गेट केले जात असून आमच्या आडून धनंजय मुंडे यांची देखील बदनामी केली जात आहे. बीड व नागपूर पोलिस अधीक्षक यांना आम्ही या प्रकरणी सखोल चौकशी करण्याची विनंती करत आहोत. आम्ही सर्व प्रकारच्या चौकशीसाठी पोलिस प्रशासनास सहकार्य करण्यासाठी तयार आहोत. मात्र संबंधित महिलेने केलेले आरोप धादांत खोटे व बदनामी कारक असल्याने त्यांच्या विरोधात कायदेशीर अब्रु नुकसानीचा दावा देखील दाखल करणार असल्याचे निखिल फड व त्याचे पिता कैलास फड यांनी म्हटले आहे.

## पाटबंधारे विभागाने वॉल्वला सील ठोकले...

त्याची कसलीच दखल न घेतल्याने दि.१८ फेब्रुवारी रोजी पाटबंधारे विभागाने पाणी पुरवठ्याच्या वॉल्वला सील ठोकले आहे.

## ब्लॉकबॉक्स डेटासाठी अमेरिकेची मदत..

विमानात दोन स्वतंत्र फ्लाइट रेकॉर्डर होते. अपघातादरम्यान दोन्ही रेकॉर्डर (ब्लॅकबॉक्स) दीर्घकाळ तीव्र उष्णतेच्या संपर्कात होते आणि आगीमुळे त्यांचे नुकसान झाले होते. एएआयबीनुसार, एल-३-कम्युनिकेशन्सद्वारे निर्मित डिजिटल फ्लाइट डेटा रेकॉर्डर (डीएफडीआर) त्यांच्या फ्लाइट रेकॉर्डर प्रयोगशाळेत यशस्वीरित्या डाउनलोड करण्यात आला आहे. लिअरजेट ४५ विमान अपघाताची सविस्तर आणि व्यापक चौकशी सुरू आहे. ही चौकशी विमान (अपघात आणि घटनांची चौकशी) नियम, २०१७ अंतर्गत निश्चित केलेल्या आंतरराष्ट्रीय मानकांच्यानुसार केली जात आहे.

हनीवेलद्वारे निर्मित कॉकपिट व्हॉइस रेकॉर्डर (सीव्हआर) ची सविस्तर तांत्रिक तपासणी सुरू आहे. डेटा मिळवण्यासाठी संबंधित कँपनीच्या मदतीची गरज लागणार आहे. यासंदर्भातील मान्यताप्राप्त प्रतिनिधीकडून मदत मागितली गेली आहे, असे चौकशी एजन्सीने म्हटले आहे. या प्रकरणात, ही यंत्रे उत्पादन करणारी कँपनी अमेरिकेतील आहे, त्यामुळे त्यांच्याकडे ही मागणी केलेली आहे.

...मग ब्लॅक बॉक्स जळाला कसा ? - मिटकरी

विमानाची टेल (शेपटी) पूर्णपणे सुस्थितीत असल्याने ब्लॅक बॉक्सला काहीही डॅमेज होण्याचा संबंध येत नाही, असे राष्ट्रवादी अजित पवार गटाचे आमदार अमोल मिटकरी यांनी म्हटले आहे. विमानाचे शेपूट सुस्थितीत आहे मग ब्लॅक बॉक्स जळाला कसा, असा सवाल मिटकरी यांनी उपस्थित केला आहे. विमानाचा ब्लॅक बॉक्स शेपटीमध्ये असतो, विमानाचा अपघात होतो तेव्हा शेपटी पूर्णपणे जळत नाही त्यामुळेच हा ब्लॅक बॉक्स शेपटीमध्ये ठेवला जातो. अपघातग्रस्त विमानाची शेपटी पूर्णपणे सुस्थितीत आहे, ती अजिबात जळालेली नाही, त्यामुळे ब्लॅक बॉक्सला काहीही डॅमेज होण्याचा संबंध नाही, असे मिटकरी यांचे म्हणणे आहे.

## बीडच्या शिक्षण विभागाला घाई का झाली...

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सर्व कार्यरत शिक्षकांना टीईटी/सीटीईटी परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी वेळ व संधी देणे बंधनकारक असतांनाही केंद्रप्रमुख पदोन्नतीचा घाट म्हणजे काहीतरी आर्थिक व्यवहार करण्याच्या अनुषंगाने केलेला प्रयत्न असावा अशी देखील चर्चा होत आहे. या प्रकरणात काही सेवाज्येष्ठ शिक्षकांनी राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा बीडच्या पालकमंत्री सुनेत्राताई पवार यांच्याकडे देखील तक्रार केली असून केंद्रप्रमुख पदोन्नतीची प्रक्रिया स्थगित करावी अशी मागणी केली आहे. केंद्र शासनाच्या २५ ऑगस्ट २०१० च्या अधिसुचनेनुसार कार्यरत शिक्षकांनी टीईटी परीक्षा देणे बंधनकारक नाही असे स्पष्ट केलेले आहे त्यामुळे महाराष्ट्रासह इतर कोणत्याही राज्याने त्यांच्या अधिनस्थ कार्यरत शिक्षकांना टीईटी किंवा सीटीईटी परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी बंधनकारक केलेले नाही. सर्वोच्च न्यायालयाने दि.१ सप्टेंबर २०२५ रोजी सर्व शिक्षकांना सप्टेंबर २०२७ पर्यंत टीईटी/सीटीईटी परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक केलेले आहे परंतु बीड जिल्हा परिषदेने डिसेंबर २०२२ पासून न्यायप्रविष्ट असलेली केंद्रप्रमुख पदोन्नती प्रक्रियेमध्ये तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश पाठक यांनी १५ जुलै २०२४ पर्यंत कालबद्ध वेळापत्रकाद्वारे पदोन्नती प्रक्रिया पूर्ण करण्याचे शपथपथ उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात २० फेब्रुवारी २०२४ रोजी सादर केलेले असतांनाही न्यायालयाचा अवमान करुन पुन्हा नव्याने केंद्रप्रमुख पदोन्नतीची प्रक्रिया बीडच्या शिक्षण विभागाने सुरु केली आहे. बीडच्या शिक्षण विभागाचा हा निर्णय सेवाज्येष्ठ शिक्षकांवर अन्याय करणारा असल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

## माजलगावात शिवजन्मोत्सवात २२ जोडपे विवाहबद्ध

शेतक-यांसह सर्वसामान्यांना लाभ होत आहे. त्यामुळे या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. वधु - वरांची वरात ही स्कॉर्पिओ गाडीतुन हनुमान मंदिर ते विवाहस्थळापर्यंत साध्या पध्दतीने काढण्यात आली होती. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमीत्त आयोजित या कार्यक्रमात सर्वधर्मीय परंपरांचा सन्मान राखत विवाह विधी पार पडले. उपस्थित मान्यवरांनी नवदांपत्यांना शुभाशिर्वाद देत त्यांच्या वैवाहिक जीवनासाठी मंगलकामना व्यक्त केल्या. दरम्यान सामूहिक विवाहामुळे अनेक कुटूंबातील आर्थिक भार हलका झाला असून समाजात एकोपा आणि सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडले. कार्यक्रमाचे नियोजन काटेकोरपणे करण्यात आले होते तर माजलगावात पार पडलेला हा सोहळा सामाजिक सलोख्याचा आदर्श ठरत आहे.

या विवाह सोहळ्यामध्ये रेखाताई होके यांनी शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित केलेली नाटिकेचे सादरीकरण यामुळे उपस्थितांची मने जिंकली. या सामूहिक विवाह सोहळ्याला विविध राजकीय पक्षाचे नेते कार्यकर्ते सामाजिक संघटनेचे नेते व्यापारी, वकील, डॉक्टर, पत्रकार, शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बोरफडी येथे रिंकू राजगुरु येणार...

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाच्या माध्यमातून ग्रामीण विकासाच्या विविध योजना व उपक्रमांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचा उद्देश आहे. या कार्यक्रमास जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, उपमुख्य कार्यकारी अधिकारी किशोर काळे तसेच गटविकास अधिकारी अनिकेत सानप उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमादरम्यान विविध विकासकामांची पाहणी तसेच नवीन कामांचा शुभारंभ करण्यात येणार आहे. या अभियानामुळे ग्रामविकासाच्या योजनांना अधिक गती मिळणार असून नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी करावा, असे आवाहन सरपंच कैलास घुगे यांनी केले आहे.

कैलास घुगे यांनी केला गावाचा कायापालट

बोरफडीचे सरपंच कैलास घुगे यांच्या नेतृत्वाखाली गावातील प्रत्येक वस्तीपर्यंत रस्ते, वीज व पाणी या मूलभूत सुविधा पोहोचविण्यात आल्या आहेत. विविध शासकीय योजनांच्या माध्यमातून अंगणवाडी, आरोग्य केंद्र, ग्रामपंचायत कार्यालयाची इमारत उभारण्यात आली आहे. गावात अनेक ठिकाणी आसन व्यवस्था, उद्यान निर्मिती, वृक्षलागवड तसेच जलसंधारणाची कामे मोठ्या प्रमाणावर करण्यात आली आहेत. या सर्व उपक्रमांमुळे बोरफडी हे गाव आदर्श गाव म्हणून नावारूपाला येत आहे.

# वर्षाअखेर एसटी आर्थिकदृष्ट्या सुदृढ होणार ; तब्बल ८ ३ ० ० नवीन बसेस ताफ्यात होणार दाखल

मुंबई दि.१९ :- दैनंदिन १ ते १.५ कोटी रुपयांची तूट सहन करत आर्थिक दडपणाखाली असलेल्या एसटीला नवसंजीवनी देण्यासाठी शासनाने मोठा निर्णय घेतला आहे. बसेसची कमतरता हा मुख्य अडथळा दूर करत यंदा तब्बल ८,३०० नवीन बसेस ताफ्यात सामील करण्याचा निर्धार परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केला. बसेस वाढल्या तर प्रवासी वाढतील, आणि प्रवासी वाढले तर उत्पन्न आपोआप वाढेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कोरोना पूर्वीचा सुवर्णकाळ आणि नंतरची घसरण: कोरोना महामारीपूर्वी एसटीकडे १८ ते १९ हजार बसेस होत्या. दररोज सुमारे ६६ लाख प्रवासी एसटीने प्रवास करत होते. मात्र महामारी आणि दीर्घकालीन कर्मचाऱ्यांच्या संपामुळे गेल्या चार-पाच वर्षांत बसखरेदी रखडली. परिणामी २०२४ अखेर बसेसची संख्या घटून सुमारे १२,६०० वर आली. दरम्यान, राज्य शासनाने महिलांना तिकिटात ५०% सवलत आणि ७५ वर्षांवरील ज्येष्ठांना मोफत प्रवास दिल्याने प्रवाशांचा ओघ पुन्हा वाढू लागला. सध्या दररोज सुमारे ५० लाख प्रवासी एसटीने प्रवास करतात ; मात्र अनेक मार्गांवर फेऱ्या अपुऱ्या पडत आहेत.

८,३०० बसेसचा भव्य आराखडा

एसटीच्या दीर्घकालीन धोरणानुसार पुढील काही वर्षांत २० ते २५ हजार बसेस खरेदी करण्याचा मानस आहे. त्यास राज्य शासनाची तत्वतः मान्यता मिळाली असून, यंदा पहिल्या टप्प्यात ८,३०० बसेस दाखल होणार आहेत. त्यामध्ये ३,००० ३ै २ आसन रचनेच्या ५५ आसनी बसेस मार्चपासून टप्प्याटप्प्याने सुरु होतील. या बसेसना राजमाता जिजाऊ साहेब यांचे नाव देण्यात आले आहे. तर ५,००० साध्या बसेसची निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात आली आहे. तर खाजगी वाहतुकीशी स्पर्धा करण्यासाठी २०० अत्याधुनिक बसेसची तरतूद करण्यात आली आहे.

पान ६ वरून

## गौतम आठवले यांचे निधन

मुलगा, दोन मुली, जावाई, भावजयी, एक भाऊ, एक बहीण, पुतणे असा परिवार आहे. आठवले कुटुंबियांच्या दुःखात पार्श्वभूमी परिवार सहभागी आहे.

## सौ.सुमित्रा प्रदीप पांडे यांचे निधन

मुलगी प्रिती, मुलगा सुमित विशाल, सुन व नातू असा परिवार आहे.मयत सुमित्रा प्रदीप पांडे यांची अंत्ययात्रा दि. २० फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता आदर्श कॉलनी, सांगली बँकेच्या पाठीमागून निघणार असून अमरधाम, मोंढा रोड, बीड येथे अंत्यविधी होणार आहे.

## आता अल्पवयीन मुलाच्या कमरेलाही पिस्तूल

पोलीस ठाण्यात शस्त्र अधिनियम कलम ३/२५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.ही कारवाई नवनीत काँवत, पोलीस अधीक्षक बीड, सचीन पांडकर, अपर पोलीस अधीक्षक बीड, तसेच शिवाजी बंटेवाड, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, बीड यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या पथकात सपोनि धनराज जारवाल, पोउपनि श्रीराम खटावकर, पोलीस हवालदार अशोक दुबाले, सोमनाथ गायकवाड, बाळू सानप, आनंद मस्के, अर्जुन यादव, मनोज परजणे व चालक सिद्धेश्वर मांजरे यांनी सहभाग घेतला.

## नेकनूर येथील मूकबधिर शाळेवर शिवजयंती साजरी

अशा प्रकारे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्याबद्दल श्रीमती खराटे मॅडम व कुलकर्णी सर, गिराम सर यांनी आपल्या मनोगत मधून थोडक्यात सांगितली. कार्यक्रमाचे प्रस्ताविक तांबिले सर यांनी केली. सूत्रसंचालन श्रीमती खरंगुळे मॅडम यांनी केले. कार्यक्रमाचे आभार श्रीमती लोखंडे मॅडम यांनी मानले.

## छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयघोषाने दुमदुमली पाटोदा नगरी

उपविभागीय पोलीस अधिकारी बाळकृष्ण हनपुडे पाटील, ज्येष्ठ नेत्या सत्यभामा बांगर, नगराध्यक्षा दिपाली जाधव, उत्सव समितीचे अध्यक्ष संतोष जाधव तसेच पत्रकार संघाचे अध्यक्ष सोमीनाथ कोल्हे आणि पत्रकार बांधवांच्या हस्ते पूजन करण्यात आले. रांगोळी स्पर्धाही उत्साहात पार पडल्या.शहरात सर्वत्र आकर्षक सजावट व रोषणाई करण्यात आली होती. प्रमुख चौकांसह पाटोद्यात भगवे झेंडे फडकत होते. सायंकाळी उशिरापर्यंत शिस्तबद्ध मिरवणूक सुरू होती. पोलिस प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवत कार्यक्रम निर्विघ्न पार पाडला. मनोज जरांगे पाटील यांच्या आगमनाने उत्सवाच्या जल्लोषात अधिकच भर पडली आणि शिवजयंती सोहळा ऐतिहासिक ठरला.

## स्वयंभू श्री महादेव मंदिर श्रीक्षेत्र शेळकेवाडी (पि) येथील सप्ताहाची सांगता

यांनी दान दिलेली आहे. महाशिवरात्री च्या पवित्र पर्वकाळात येथे दर वर्षी अखंड हरिनाम सप्ताह चे आयोजन करण्यात येते याठिकानी स्वयंभू महादेव मंदिर आहे . नागमोडी रस्ते, उंच डोंगर गावाच्या सभोवताली अत्यंत निसर्गरम्य वातावरण असल्याने मंदिर परिसर उजळून निघालेला आहे. अमृताश्रम स्वामी महाराज यांच्या मार्गदर्शना खाली सप्ताह आयोजित करण्यात येतो.श्री क्षेत्रशेळकेवाडी सप्ताहस रायमोह येथील सरपंच श्रीसुभाषशेठ क्षीरसागर,माजी सरपंच लहू ढाकणे,भरतभाऊ जाधव ,पत्रकार रामेश्वर क्षीरसागराळे यांनी या सप्ताहास भेट दिली. मठाधिपती अमृत महाराज जोशी यांचे आशीर्वाद घेतले. शेळकेवाडी चे सरपंच बाबाजी शेळके यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला .मुळशी पं.स च्या नवनिर्वाचित सदस्य सौ,मंदाताई बाबाजी शेळके यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी श्रीमधुकर शेळके, नवनाथ शेळके, गोरख शेळके,अनिकेत कुलकर्णी यांच्यासह श्रीक्षेत्र शेळकेवाडी, गवारेवाडी, पिंपळोली परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते काल्याच्या कीर्तनानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

## शिवरायांचे विचार वारंवार समाजासमोर आणणे गरजेचे–कृष्णा रामदासी

अभ्यासायला हवे. यामुळे युवकांमध्ये राष्ट्रप्रेमाची आणि स्वाभिमानाची भावना प्रज्वलित होते, म्हणूनच शिवरायांचा इतिहास घराघरात पोहोचवणे ही काळाची गरज आहे. असे प्रतिपादन रामदासी यांनी केले.

कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना मुख्य प्रशासकीय अधिकारी तथा मुख्याध्यापक मा. प्रा. चंद्रकांत मुळे यांनी सांगितले की, केवळ घोषणा देऊन शिवजयंती साजरी करणे पुरेसे नाही, तर महाराजांचा 'शिस्त' हा गुण आपल्या जीवनात उतरवणे महत्त्वाचे आहे. सावरकर विद्यालयाचा प्रत्येक विद्यार्थी शिवरायांच्या विचारांचा वारसदार व्हावा, अशी आमची धारणा आहे. संकटाच्या वेळी डगमगून न जाता संयमाने मार्ग काढणे हीच शिवरायांची खरी शिकवण आहे. असे प्रतिपादन करून सर्वांना शिवजयंतीच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाची सुरुवात अभिजीत भालेकर यांनी सादर केलेल्या 'शिवप्रेरणा मंत्राने' झाली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. हरिभाऊ साबळे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले, तर सौ. गौरी डावखरे यांनी सूत्रसंचालन केले. तर आभार प्रदर्शन प्रा. संतोष जोशी यांनी केले.याप्रसंगी व्यासपीठावर विद्यासभा उपाध्यक्ष उमेश जगताप, प्राचार्य सुहास मोराळे, उपमुख्याध्यापक संदीप देशमुख, उपप्राचार्य डॉ लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, डॉ. उत्तम साळवे आणि विभागप्रमुख प्रा. बाळासाहेब साळवे यांची उपस्थिती होते.

## श्री नारायण मा.व उ.मा.विद्यालयात शिवजयंती उत्साहात साजरी

यांनी श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला हार घालून अभिवादन केले. प्राचार्य अमोल काळे सर यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवन कार्याविषयी माहिती दिली. सूत्रसंचालन करपे सर यांनी केले तर प्रास्ताविक प्रा.अशोक घरत सर यांनी केले आभार प्रदर्शन प्रा. धर्मराज पौळ सर यांनी मानले. कार्यक्रमाला प्रा. मस्के जी.बी, प्राध्यापक रकटे पी.आर,रकटे एन.पी, पवार पी .एल, शेख सर , प्रा.मुरमुडे ए .एन,चौधरी पी.,रकटे बी. आर, श्रीमती काळे मॅडम श्रीमती भुतावळे मॅडम, श्रीमती मस्के मॅडम, श्रीमती जगताप मॅडम, तसेच विद्यार्थी, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पीएम श्री जिल्हा परिषद माध्यमिक शाळा पिंपळनेर या ठिकाणी शिवजयंती साजरी

प्रकाश टाकला तिसरी या वर्गातील सोनाली थोरात हिने अतिशय मार्मिक शब्दात शिवरायांची महती सांगितली त्याबद्दल निळकंठ सर यांनी तिला शंभर रुपये बक्षिस देऊन तिचा गौरव केला. अशा रीतीने कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी सर्व शिक्षक कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पालवण गावात मध्यरात्री बसवला

निखिल मस्के पाटील, यांच्यासह काही मावळ्यांनी गनिमी कावा करत महाराजांच्या जयंतीच्या पूर्व संध्येला रात्रीतून भव्य दिव्य पुतळा उभा केला. त्यासाठी जागा सुद्धा अत्यंत महत्वाची निवडली.मावळयांनी आखलेली ही रणनिती अत्यंत कौतुकास्पद आहे.

## शेतकऱ्यांची जाण असल्यामुळे माझ्या संस्थेला 'शेतकरी शिक्षण संस्था' असे नाव

इंजि. बाळासाहेब भुकन, दिलीप मस्के फौजी, अजय वाबळे, रोहित गांगर्डे, संतोष म्हेत्रे, शाखा व्यवस्थापक शाही साहेब, सदा पाटील दिंडे, माजी सरपंच संतोषभैय्या चव्हाण, पांडुरंग गावडे, संजय चंदनशिव, डॉ. डी. बी. राऊत, प्राचार्य संजय नालकोल, संभाजी दहातोंडे, बाबा ससाने, गौतम सावंत, कुंडलिक आस्वर, गौतम ससाने, रामनाथ बन, प्रा. बाळासाहेब धोंडे, हरी पाटील बोडखे, प्राचार्य सुरेश बोडखे, प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ, चेअरमन दादासाहेब हजारे, नानाभाऊ वाडेकर, बबनराव डोके, विठ्ठल लांडगे, सरपंच भरत जाधव, सुधीर जगताप, श्रीम. इंदूबाई गोल्हार, ॲड. मसरफ सर, संतोष सानप, महेश दादा निमोणकर, राजेंद्र लाड आदी सरपंच, उपसरपंच, कार्यकर्ते, नागरिक, शेतकरी, महिला, विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मराठवाड्यातील सर्वात मोठे डॉ. स्वामीनाथन कृषी प्रदर्शन आयोजित केल्याबद्दल माजी आ. भीमरावजी धोंडे साहेबांचा तसेच सौ. दमयंतीताई धोंडे, डॉ. अजय दादा धोंडे, अभयराजे धोंडे यांचा निमंत्रण म्हणून विशेष सन्मान संयोजकांच्या वतीने करण्यात आला.

प्राचार्य श्रीराम आरसूळ यांनी प्रास्ताविकात जीवनमान उंचावण्यासाठी आधुनिक व यांत्रिक शेती, प्रदूषण व कर्करोगासारख्या आजारांवरील जागरूकता, नवीन बियाणे संशोधन व शेतकरीभिमुख उपक्रमांची माहिती दिली. प्रदर्शनाचा सविस्तर आढावा मांडताना त्यांनी शेतकऱ्यांनी नव्या तंत्रज्ञानाचा स्वीकार करावा, असे आवाहन केले. एआयच्या माध्यमातून स्व. अजितदादा पवार यांच्या शुभेच्छाही घेण्यात आल्या.

ह.भ.प. रंधवे बापू महाराज म्हणाले, नेत्यांनी जगवायचे असते आणि साधू–संतांनी जागवायचे असते. या दोन्हींची सांगड घातली तर समाजसुधारणा निश्चित होते. त्यांनी परोपकार, पुण्यकर्म व समाजसेवेचे महत्त्व अधोरेखित केले. ह.भ.प. विठ्ठल महाराजांनी लोकप्रतिनिधींनी समाजसन्मुख राहून शेतकरी वर्गाला सर्वतोपरी सहकार्य करावे, असे सांगितले. ह.भ.प. आजिनाथ आंधळे महाराजांनी गावरान जनावरांचे महत्त्व, सेंद्रिय शेतीची गरज आणि प्रत्येकाने किमान एक गाय पाळावी, असे आवाहन केले. सेवानिवृत्त कृषी आयुक्त सुनिल चव्हाण यांनी शेतीत नियमित बदल करून आधुनिक अवजारे, संकरित बियाणे व गटशेतीचा अवलंब करावा, असे मत व्यक्त केले.

माजी आ. बाळासाहेब आजबे यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि नव्या तंत्रज्ञानाचा वापर शेतकऱ्यांनी करावा, असे सांगितले. माजी आ. जनार्धन तुपे यांनी सामाजिक जाणीव असलेल्या नेतृत्वाची गरज अधोरेखित करत भीमराव धोंडे यांना दीर्घायुष्य लाभावे, अशी सदिच्छा व्यक्त केली.अध्यक्षीय भाषणात माजी आ. भीमराव धोंडे म्हणाले, शेतकऱ्यांची जाण असल्यामुळे माझ्या संस्थेला शेतकरी शिक्षण संस्था असे नाव दिले. शेतकऱ्यांना मिळणाऱ्या अनेक शासकीय योजनांतील त्रुटी शासनाने दूर कराव्यात. डॉ. स्वामीनाथन यांनी शेतकऱ्यांसाठी मोठे कार्य केले ; त्यांच्या नावाने हे प्रदर्शन आयोजित केले आहे. ते पुढे म्हणाले की, भगवान महाविद्यालयात लवकरच एआय तंत्रज्ञान सुरू करून त्याचा वापर शेतकऱ्यांच्या हितासाठी केला जाणार आहे. या प्रदर्शनासाठी शासनाचा एकही रुपया घेतलेला नाही व घेणारही नाही. लवकरच कॅन्सर हॉस्पिटल सुरू करण्याचा मानस असून त्यासाठी सव्वाशे एकर जमीन संस्थेला दिल्याची माहिती त्यांनी दिली. जूनपासून पॉलिटेक्निक कॉलेज व इतर महाविद्यालये सुरू करण्यात येणार असल्याचेही त्यांनी जाहीर केले. हार–जीत मी पाहत नाही ; शेतकऱ्यांसाठी झगडत राहणार, अशी ठाम भूमिका त्यांनी व्यक्त केली. शिवजयंतीनिमित्त हे प्रदर्शन आयोजित करण्यामागे छत्रपती छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रजाहितदक्ष व शेतकरीहिताच्या विचारांना अभिवादन करण्याचा हेतू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तालुक्यातील महाराजांनी कीर्तनातून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

## आरोग्य विभागातील सेवानिवृत्तीधारकांचे प्रलंबीत प्रकरणे निकाली काढावेत

ध्रूपद यादव , जिल्हा कोषाध्यक्ष सुग्रीव नेटके , महिला सदस्य आशा दुधमल,कास्ट्राईब संघटनेचे राज्य उपाध्यक्ष सूर्यकांत जोगदंड, सेवानिवृत्त कर्मचारी कल्याण सुतार, शेख समी आणी ईतर संघटनेचे सदस्य बैठकीस उपस्थित होते. म.रा.जि.प.सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेचे राज्य अध्यक्ष शेख वजीर यांनी बैठकीत सांगितले की संघटनेने अद्याप पर्यंत सेवानिवृत्त कर्मचा–याचे अनेक प्रलंबीत प्रकरणे पेन्शन अदालत बैठकीत ठेवण्यात आली होती त्यापैकी कालबध्द पदोन्नती,प्रलंबीत पेन्शन प्रकरणे, वैद्यकीय प्रतिपूर्ती,भविष्य निर्वाह निधी,गटविमा योजना,स्वग्राम प्रवास भत्ता देयके अशाप्रकारे अनेक प्रकरणे डॉ.रौफ सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी व जिल्हा आरोग्य अधिकारी गंडाळ साहेब आणी कार्यालयातील ईतर अधिकारी व कर्मचा–यांनी प्रकरणे निकाली काढलेली आहे करिता त्यांचे आभार व्यक्त करण्यात आले व काही प्रलंबीत प्रकरणापैकी

श्रीमती आशा दुधमल यांचे सेवानिवृत्तीनंतर त्यांचे रजारोखीकरणाचे बिलातून अतिप्रदानाची चुकीची वसूल केलेली रक्कम व्याजासह प्रदान करणेबाबत लोक आयुक्त मुंबई यांना केलेल्या तक्रारीच्या अनुपालन अहवाल बीड जिल्हा परिषदेच्या सी.ई. ओ.च्या मान्यतेने सादर करणेबाबत सविस्तर चर्चा केली असता यावर कारवाई चालू असल्याचे सांगितले. तसेच कल्याण सुतार यांचे सेवानिवृत्त होऊन दहा वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असतानाही सेवानिवृत्तीचे संपूर्ण लाभ व पूर्ण पेन्शन मिळत नसल्याबाबत च्या तक्रारीवर संघटनेच्या पाठपुरामुळे आरोग्य विभागाने सुधारित आदेश निर्गमित करून वित्त विभागात सादर केले असून त्यांना लवकरच सर्व लाभ मिळतील असे सांगण्यात आले . यानंतर काही सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे कालबद्ध पदोन्नती चे प्रस्ताव अद्याप तीन वर्षापेक्षा जास्त कालावधी पासून प्रलंबित आहे या याबाबतच्या सर्व संचिका सामान्य प्रशासन विभागाकडे सादर केलेल्या

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक गंमत भंडारी यांनी शाम प्रिंटर्स, नवी भाजी मंडई बीड येथे छापून पार्श्वभूमी कार्यालय, नवी भाजी मंडई रोड, बीड येथे प्रकाशित केले. फोन नं. (०२४४२) २३०१०१.
AR/TECH/Regd. N.P./34/Beed/99-2000 RNI Regd.no. MAHMAR/1990/501 E-mail Address-parshvabhoomi@gmail.com

# पार्श्वभूमी

दिनांक २० फेब्रुवारी २०२६ पान -३


## चकलांबा येथे शिवजयंती साजरी

चकलांबा दि १९ (प्रतिनिधी)- चकलांबा येथे दि १९ फ्रेबुवारी शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले ह.भ.प.सखाराम महाराज तागडे यांच्या हस्ते दिप प्रज्वलन करून प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला.या शिवजयंती कार्यक्रमाचे अध्यक्ष कृष्णा हिगे तसेच उपाध्यक्ष अक्षय गाडे म्हणून निवड करण्यात आली या वेळी शिव गर्जना करण्यात आली. या वेळी उपस्थित ग्रामस्थ डॉ विजय कुमार घाङ्गे माजी जिल्हा परिषद सदस्य ,पंचायत समितीत सदस्य शेख तय्यब भाई ,डॅक्टर सुहास घाडगे, सतोष घाङ्गे,अजिनाथ खेड्कर ग्रा.प सदस्य, नामदेव कोळसे, कॅप्टन सिकंदर भई,शेषेराव निबाळकर, गणेश गाडे ग्रा प सदस्य व चकलांबा ग्रामस्थ उपस्थित होते

## भगवान विद्यालयात शिवजयंती मोठ्या उत्साहात झाली साजरी

बीड दि १९ (प्रतिनिधी)- बीड शहरातील भगवान विद्यालयामध्ये अखंड हिंदुस्थानचे आराध्य दैवत, स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९६ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक अंकुशराव आघाव सर, पर्यवेक्षक ढोकर सर यांच्या शुभहस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा गौरव अध्यक्षीय समारोपातून समारोपातून शाळेचे मुख्याध्यापक आघाव सर यांनी केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डी.पी. डोळे सर यांनी केले तर उपस्थितांचे आभार नामदास सर यांनी मानले.कार्यक्रमासाठी सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# नायगाव मयूर अभयारण्य येथील अधिकाऱ्यांची विभागीय चौकशी करण्याचे खंडपीठाचे आदेश

## माहिती अधिकाराखाली माहिती न देणे आले अंगलट

छत्रपती संभाजी नगर दि १९ (प्रतिनिधी)- पाटोदा तालुक्यातील नायगाव मयूर अभयारण्य येथील पक्षी व प्राणी संवर्धनासाठी महाराष्ट्र सरकारकडून आलेला निधी कागदोपत्री कामे दाखवून हडप केलेल्या संदर्भातील तक्रारीची चौकशी तर झालीच नाही परंतु निधी संदर्भात माहिती अधिकार कायद्याखाली तक्रार करून हे कोणी दखल घेतली नाही शेवटी तक्रार दाराने खंडपीठात धाव घेतली. तसे या प्रकरणाची न्यायमूर्ती सौ. विभा कंकणवाडी व न्यायमूर्ती हितेन एस. वेणेगावकर यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. न्यायालयाने प्रतिवादी यांच्यावर माहिती न दिल्या प्रकरणी नायगाव मयूर अभयारण येथील अधिकारी यांच्यावर विभागीय चौकशी करून तात्काळ कारवाई करण्यात यावी व माहिती अधिकार कायद्याअंतर्गत संबधीतावर दंडात्मक कारवाई करावी तसेच याचिकाकर्त्यास एक महिन्यात मागितलेली माहिती उपलब्ध करून देण्यात यावी असे आदेश प्रारित केले आहेत. याचिकाकर्त्याच्यावतीने ॲड.शशिकांत ई. शेकडे यांनी काम पाहिले त्यांना ॲड.पृथ्वीराज ए.ढाकणे , ॲड.विशाल आर. थावरे, ॲड.रोहित नरवडे व ॲड.सुदर्शन जोजार यांनी सहकार्य केले.

बाबत असे की पाटोदा तालुक्यातील नायगाव मयूर अभयारण्य हे मुख्यतः राष्ट्रीय पक्ष्यांच्या संवर्धनासाठी प्रसिद्ध आहे. भारताचा राष्ट्रीय पक्षी मोर तसेच काळवीट ,लांडगा ,कोल्हा ,ससा तसेच १०० हुन अधिक पक्ष्यांच्या प्रजातीचे नायगाव येथे संवर्धन केले जाते.महाराष्ट्र सरकारकडून पक्षी व प्राणी संवर्धनासाठी करोडो रुपयांचा आजतागायत निधी आलेला असून अभयारण्यातील अधिकारी यांनी कागदोपत्री कामे दाखवून करोडो रुपये हडप केले आहेत असा आरोप याचिकादार बालाजी बेद्रे यांनी वारंवार तक्रारीद्वारे केली होती परंतु त्यावर कुठलेही कार्यवाही न केल्यामुळे बेद्रे यांनी माहिती अधिकार कायद्याअंतर्गत वन्य अभयारण्य यांना २०१८ ते २०२३ या वित्तीय आर्थिक वर्षांत शासनाकडून आलेला निधी व खर्च केलेले देयके याची माहिती मागितली होती परंतु जनमाहिती अधिकारी यांनी कुठलीही वेळेत माहिती न देता त्या अर्जाकडे दुर्लक्ष केल्यामुळे बेद्रे अर्जदार यांनी राज्य जनमाहिती आयोग छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे द्वितीय अपील दाखल करून त्या निर्णयाला आव्हान दिले होते. राज्य माहिती आयोगाने यांनी अर्जदार यांचा अर्ज मंजूर करून जनमाहिती अधिकारी नायगाव यांना सदर माहिती अर्जदार यांना ३० दिवसात विनामूल्य उपलब्ध करून देण्याचे आदेशित केले होते.

राज्य माहिती आयोग यांच्या आदेशाला जनमाहिती अधिकारी नायगाव अभयारण्य यांनी केराची टोपली दाखवत त्या आदेशाकडे दुर्लक्षित केले होते. त्यामुळे अर्जदार यांनी त्या आदेशाची अंमलबजावणी तात्काळ करून माहिती देण्यात यावी म्हणून पुन्हा राज्य माहिती आयोग यांना तक्रार करून कार्यवाही करण्याची मागणी केली होती.

सदर अर्जाच्या अनुषंगाने कुठलीही कार्यवाही न झाल्यामुळे अर्जदार यांनी उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे ॲड.शशिकांत शेकडे यांच्यामार्फत माहिती अधिकार अधिनियमांतर्गत मागितलेली माहिती देण्यात झालेल्या विलंबाबाबत याचिका दाखल करून दाद मागितली होती. यावेळी युक्तीवादात राज्य माहिती आयोगाने दि. १७ जानेवारी २०२४ रोजी याचिकाकर्त्याला माहिती देण्याचा आदेश दिला असतानाही प्रत्यक्षात माहिती पुरविण्यात आलेली नाही. याबाबत याचीका कार्त्यानिस सर्व ठिकाणी दाद मागितली परंतु माहिती मिळाली नाही. असे नमूद केले शेवटी सुनावणीनंतर न्यायमूर्ती सौ विभाग कंकणवाडी व न्यायमूर्ती हितेन एस वेणेगावकर यांच्या खंडपीठाने नायगाव मयूर अभयारण्य येथील अधिकारी यांच्यावर विभागीय चौकशी करून तात्काळ कार्य कारवाई करण्यात यावी तसेच माहिती अधिकार कायद्यांतर्गत संबंधित आवर दंडात्मक कारवाई करावी अशा स्वरूपाचे आदेश दिले.

## रस्त्यावर पाणी सोडून नागरिकांना वेठीस धरणारे घोळवे हॉस्पिटल

बीड दि १९(प्रतिनिधी)- शहरातील एसपी कार्यालया समोरून यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाकडे जाणाऱ्या रस्त्यावर एका हॉस्पिटल मधून दररोज रस्त्यावर पाणी सोडलं जात असल्याने त्याचा नागरिकांना मोठा त्रास सहन करण्याची वेळ आली. सदर रस्त्यावर पाणी सोडणारे हॉस्पिटल दुसरे कोणते नसून घोळवे हॉस्पिटल असल्याने या बाबत आता नगरपालिका काय कारवाई करते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे .यासंदर्भात माहिती अशी की घोळवे हॉस्पिटल चालकांनी आपल्या हॉस्पिटलच्या इमारतीच्या वरती आणखीन मजला बांधणे चालवले परंतु त्यासाठी वापरण्यात येणारे पाणी शकर रस्त्यावर सोडले जात होते यासंदर्भात पार्श्वभूमीने वृत्त दिले मात्र हॉस्पिटलचे नाव प्रसिद्ध न झाल्याने अनेकांनी फोन करून नेमका कोणता हॉस्पिटल आहे अशी विचारण केली . तेव्हा आपले बांधकामाचे पाणी चक्क रस्त्यावर सोडून नागरिकांना वेठीस धरणारे घोळवे हॉस्पिटल आहे. दरम्यान गुळवे हॉस्पिटलच्या समोर आली




असताना त्यावर हॉस्पिटल चालकांने कॉंक्रट केल्याने नालीच राहिली नाही ज्यामुळे सदरच्या पाणी रस्त्यावरून वाहत होते आता नगरपालिका नाली वरील केलेले कॉंक्रीट काढून टाकणार आहे का असा सवाल देखील नागरिक करू लागले. दरम्यान बातमी जरी नाव आलं नसलं तरी हॉस्पिटल चालकाने शिवजयंती दिवशी रस्त्यावर पाणी न येण्याची मात्र काळजी घेतली असल्याचे दिसून आले. तेव्हा बांधकामावर काम करणारे मजुरांनी शिवजयंतीची सुट्टी घेतल्यामुळे पाण्याचा वापर झाला नाही की बातमी मूळ रस्त्यावर पाणी जाऊ नये याची काळजी घेतली असे मात्र परिसरातील लोकांमध्ये बोलले जात होते.

## रस्ता सुरक्षा अभियान-२०२६ चा आज पोलीस मुख्यालय येथे समारंभ पूर्वक समारोप

बीड दि १९ (प्रतिनिधी)- बीड जिल्ह्यात रस्ता सुरक्षेबाबत व्यापक जनजागृती घडवून आणण्यासाठी जिल्हा वाहतूक शाखेच्या वतीने राबविण्यात आलेल्या 'रस्ता सुरक्षा अभियान-२०२६'चा शुक्रवार २० फेब्रुवारी रोजी पोलीस मुख्यालय येथे समारंभपर्वक समारोप होत आहे.

या अभियानाअंतर्गत आयोजित प्रबोधन शिबिराला रिक्षाचालकांसह युवा वर्गाचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कावत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर व उपविभागीय पोलीस अधिकारी पूजा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा वाहतूक शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक सुभाष सानप व पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर, पोलीस हवालदार अजिनाथ मुंढे, सखाराम घोलप व इतर अंमलदार यांच्या पुढाकाराने दि.०१ जानेवारी ते ३१ जानेवारी दरम्यान हे अभियान राबविण्यात आले. रिक्षाचालकांसाठी विशेष वाहतूक नियम प्रबोधन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचा समारोप कार्यक्रम आज दि. २० फेब्रुवारी २०२६ रोजी ४ वाजता पोलीस मुख्यालय बालेपीर येथे बीड येथे आयोजित करण्यात आला . दरम्यानया महिन्याभराच्या अभियानात विविध शाळेमध्ये लहान व मोठ्या गटामध्ये निबंध स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, घोषवाक्य, चित्रकला स्पर्धा घेवून विजेत्या विद्यार्थ्यांना सन्मानपत्र व बक्षिस देवून मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे. तसेच एन.सी.सी स्काऊट गाईड विद्यार्थ्यांचे संचलन होणार आहे.तसेच जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्या अध्यक्षतेखाली आणि जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते विजेत्या स्पर्धकांना बक्षिस वाटप होणार आहे. तरी या कार्यक्रमास सामाजिक कार्यकर्ते, अधिकारी, पदाधिकारी, पत्रकार, पालक वर्गाने मोठ्या संख्येने उपस्थित राहावे. असे आवाहन वाहतूक शाखेच्या वतीने करण्यात आले आहे.

## मॅथ्सवर्ल्ड क्लासेसच्या प्रत्येक विद्यार्थ्यांनी जामखेड तालुक्याचे नाव उंचवावे-कोठारी

जामखेड दि १९(प्रतिनीधी)-आपण अनेक वर्षांपासून प्रा.धनंजय भोसले सरांचे कार्य पाहत आहे. विद्यार्थ्यांना शिकवण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांनी आतापर्यंत दहा हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना घडवले आहे. त्यांच्या क्लास मधील अनेक विद्यार्थी डॉक्टर, इंजिनिअर तसेच स्पर्धा परीक्षांमध्ये उच्च पदांवर कार्यरत आहेत. प्रत्येक विद्यार्थ्याने मोठे स्वप्न पाहून जामखेड तालुक्याचे नाव उंचवावे. असे आवाहन जेन कॉम्प्रेसचे राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य तथा सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी यांनी केले.

शहरातील मॅथ्सवर्ल्ड क्लासेस येथे दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ व बक्षीस वितरण सोहळा मंगळवार दि.१७ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता उत्साहात संपन्न झाला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानावरून कोठारी हे बोलत होते तर कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून जामखेडच्या नगराध्यक्ष सौ. प्रांजलताई अमितभाऊ चिंतामणी उपस्थित होत्या. तसेच उपनगराध्यक्ष पोपटनाना राळेभात, समर्थ हॉस्पिटलचे संचालक डॉ. भरत दारकुंडे, माजी नगरसेवक दिगंबर चव्हाण, शिवम चव्हाण आदी मान्यवर व विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना प्रमुख पाहुण्या सौ. प्रांजलताई चिंतामणी यांनी सांगितले की, ''आजपर्यंत भोसले सरांच्या कार्याबद्दल ऐकून होते ; मात्र आज प्रत्यक्ष पाहून आनंद झाला. यावेळी उपनगराध्यक्ष पोपटनाना राळेभात माजी नगरसेवक दिगंबर चव्हाण ,समर्थ हॉस्पिटलचे संचालक डॉ. भरत दारकुंडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.या प्रसंगी मागील बारा महिन्यांत शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ हा कार्यक्रम घेण्यात आला यावेळी मागील वर्षात ज्या ज्या मुलांनी शिक्षणात अभ्यासात उत्कृष्ट नंबर मिळवले त्या त्या विद्यार्थ्यांना आदर्श विद्यार्थी म्हणून गौरविण्यात आले यावेळी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते त्यांना सन्मानचिन्ह घेऊन सन्मानित करण्यात आले .या वेळी सौ. स्वप्नाली धनंजय भोसले, सौ. कोमल हजारे, दीपक भोरे, शुभम पवार, माऊली सानप, शिवम चव्हाण आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी अदिती गीते व गीता नेटके यांनी केले, तर आभार प्रदर्शन अण्णा सर यांनी मानले.

## तिरूपती आश्रमशाळा शाळेत शिवजयंती साजरी

गेवराई दि १९(प्रतिनिधी)- तालुक्यातील पाचेगाव येथील तिरुपती प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेमध्ये शिवजयंती जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यांवेळी राजांना अभिवादन करतांना शामराव गूरूजी राठोड , गोरक्षनाथ आण्णा राठोड,माजी सरपंच आदरणिय आप्पासाहेब शिंदे,आदरणिय काशीनाथ तात्या बनसोडे, प्राचार्य राजेंद्र दाभाडेसर,मूख्याध्यापक राजेश खरसाडेसर,सांस्कृतिक विभाग प्रमूख बाळकृष्ण थापडे सर, ताराचंद शिंदेसर,सिताराम बनसोडेसर,रामा राऊत सर,पांडूरंग मोटेसर, नितीन देवडकसर,प्रा. सूनिल मेंढकेसर, प्रा.विष्णुपंत दाभाडेसर, राहूल वाघमारे, राजूदास चव्हाण, सूंदर राठोड, देवा फसले, जसूभाष राठोड आदिसह विदयार्थी उपस्थित होते.यावेळी शाळेतील विदयार्थीना शैक्षणिक साहित्य व फळे वाटप करण्यात आली..

### पंचायत समिती सदस्य प्रदिप सोनवणे कोळगांव ग्रामस्थांकडून सत्कारीत

कोळगांव, दि.१८ (प्रतिनिधी) - नुकत्याच झालेल्या जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणूक -२०२६ मध्ये गंगापूर पंचायत समिती सदस्यपदी प्रदिप सोनवणे पाटील यांची निवड झाली आहे. त्यानिमित्ताने गेवराई तालुक्यातील कोळगाव येथील ग्रामस्थ व ग्रामपंचायत च्या वतीने नागरी सत्कार करण्यात आला.

गेवराई तालुक्यातील कोळगावचे सुरेश लोंढे यांचे जावई प्रदिप सोनवणे यांची गंगापूर पंचायत समिती निवडणुकीत आंबेलोहाळ या गणातून निवड झाली आहे. यानिमित्ताने सत्कार केला. यावेळी प्रदीप सोनवणे यांनी बोलताना सांगितले की, कोळगाव ची लेक स्वाती सुरेश लोंढे मला लग्न झाल्यानंतर मला शुभलक्ष्मी ठरत आहे. तिच्या रुपाने सिंदी शिरसगाव फतुलाबाद या ग्रुप ग्रामपंचायत चे सदस्य, उपसरपंच, सरपंच या पदावर जनतेनी सेवा करण्याची संधी दिली आहे आणि सन-२०२६ मध्ये झालेल्या पंचायत समिती निवडणुकीत लोक आशिर्वादामुळे पंचायत समिती सदस्य म्हणून निवड केली आहे. तर सासरवाडी कोळगाव ग्रामपंचायत आणि ग्रामस्थांनी सत्कार केला केल्याबद्दल आभार मानले. यावेळी गावातील नागरिक कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन अँड कृष्णा लोंढे कोळगावकर यांनी केले.

## यशवंत विद्यालयात शिवजन्मोत्सव साजरा रंगभरण स्पर्धेचेही विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण

बीड दि. १९ (प्रतिनिधी)- शहरातील यशवंत विद्यालय या शाळेमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती शिवजन्मोत्सवाच्या स्वरूपात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

शिवजन्मोत्सव निमित्त लेझीम पथकाची रॅली काढण्यात आली .यावेळी झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष गणेश वाघ, प्रमुख पाहुण्या संस्थेच्या संचालिका तथा यशवंत प्राथमिक विद्यालयाच्या माजी मुख्याध्यापिका श्रीमती सुधामतीताई वाघ, संस्थेचे सचिव नामदेव वाघ,प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक धुमाळ एम. एस. चंपावती विद्यालयाचे शिक्षक बहिरमल के. एम. सावरकर विद्यालयाचे शिक्षक चव्हाण एस. एल. हे उपस्थित होते. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष स्व. गोविंदराव वाघ यांच्या स्मरणार्थ घेण्यात आलेल्या रंगभरण स्पर्धेमध्ये प्रथम द्वितीय तृतीय आलेल्या विजेत्यांना अनुक्रमे तीन हजार, दोन हजार, एक हजार व प्रमाणपत्र, सन्मान चिन्ह असे बक्षीस देण्यात आले. यामध्ये प्राथमिक गटातून प्रथम क्रमांक शिवाजी विद्यालय बीड या शाळेची विद्यार्थ्यांनी ईश्वरी कल्याण माने, द्वितीय क्रमांक सुभद्राबाई विद्यालयाची विद्यार्थिनी भूमिका श्रावण कुमार परदेशी, तृतीय क्रमांक स्वातंत्र्यवीर सावरकर विद्यालयाचा विद्यार्थी आर्यन जीवन भक्कड तर माध्यमिक गटातून द्वारकादास मंत्री राजस्थानी विद्यालय या शाळेची विद्यार्थिनी तनवी रामावतार मुंदडा, द्वितीय क्रमांक चंपावती विद्यालय या शाळेची विद्यार्थिनी पूजा जयवंत सोनवणे, तृतीय क्रमांक संस्कार विद्यालयाचा विद्यार्थी आदित्य शंकर चव्हाण यांचा समावेश होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेचे शिक्षक गीते एस.जी. यांनी तर आभार प्रदर्शन मुळे ए. टी. यांनी केले.

## माऊली विद्यालयाच्या दहावीच्या विद्यार्थ्यांना समारंभ पूर्वक निरोप



केज दि १९ (प्रतिनिधी) तालुक्यातील जवळबन येथील माऊली विद्यालय जवळबन या शाळेमध्ये इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा या विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक जी.बी. गदळे सर यांच्या अध्यक्षतेखाली निरोप समारंभ पूर्वक निरोप देण्यात आला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून जवळबनचे सरपंच राजेभाऊ करपे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष बालासाहेब भाकरे बप्पा, सेवानिवृत्त माजी मुख्याध्यापक माने ए.एन आणि जवळबन ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक मोरे यांची उपस्थिती होती. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना गदळे सर यांनी सांगितले की, दहावीची परीक्षा ही तुमच्या करिअरची पहिली पायरी आहे. तसेच सरपंच राजेभाऊ करपे आणि बालासाहेब भाकरे यांनीही विद्यार्थ्यांना बोर्डाच्या परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या . तर काही विद्यार्थ्यांनी देखील यावेळी आपल्या भावना व्यक्त केल्या. सदर कार्यक्रम यशस्वीतेसाठी हजारे एस.बी, सोळंके एस.डी, देशमुख आर.आर, निकम ए.एम, पवार एल.एफ यांनी परिश्रम घेतले

## मयत सुभाष पटेकर यांच्या कुटुंबीयांना सुंदरराव जाधव यांचेकडून आर्थिक मदत



माजलगाव दि १९(प्रतिनिधी)- माजलगाव तालुक्यातील जदीद जवळा येथील सुभाष पाटेकर यांच्या निधनाने त्यांचे कुटुंब हातबल झाले या दखल घेऊन सुंदरराव जाधव यांच्या वतीने पट्टेकर कुटुंबियांना जदीद जवळा येथे आर्थिक मदत देण्यात आली .यावेळी सरपंच बळीराम यादव , माजी सरपंच गाडेकर ,सरपंच गुलाबराव मोरे पाटील, शिवाजीराव मोरे पाटील, सभापती विठ्ठलराव जाधवसह गावकरी उपस्थित होते. कुटूंबातील कर्ता सुभाष पटेकर यांच्या अकस्मात निधनामुळे उघड्यावर पडलेल्या कुटूंबियांना अतिशय मोलाची आर्थिक मदत करून सुंदरराव जाधव व त्यांचे चिरंजीव राजाभाऊ जाधव यांनी आधार दिला आणि माणुसकी जोपासली. त्याबद्दल त्यांचे अभिनंदन व कौतुक होत आहे.

## महात्मा फुले यांच्या पुतळ्याच्या विटंबना प्रकरणी केज मध्ये निषेध

केज दि १९(प्रतिनिधी) -तेलंगणातील संगारेड्डी जिल्ह्यातील तेल्हापूर येथे महात्मा ज्योतिराव फुले यांच्या पुतळ्याची विटंबना झाल्याच्या निषेधार्थ महात्मा फुले युवा दलाच्या वतीने तहसीलदाराच्या मार्फत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना निवेदन देऊन दोषीवर कठोर कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली. ७ फेब्रुवारी २०२६ रोजी समाजकंटकाने हे निंदनीय कृत्य केले ज्या महामानवाने शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली स्त्री पुरुष समानता आणि सत्यशोधक विचाराचा प्रसार केला त्यांचा पुतळा पाडून त्यांचे विचार नष्ट होऊ शकत नाहीत असा संताप व्यक्त करण्यात आला. या घटनेमुळे शिव - शाहू फुले आंबेडकर यांच्या महाराष्ट्रात तीव्र पडसाद उमटले आहेत तेलंगणा सरकारने या प्रकरणात लक्ष घालून दोषीवर कठोर कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे तसेच महाराष्ट्राचे मुख्य मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सुद्धा निवेदन पाठवून दोषीवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे यावेळी महात्मा फुले युवा दल केज तालुका प्रमुख विश्वास राऊत तसेच धनराज लाटे, सरपंचपती नंदूलाल मिसाळ, संतोष सत्वधर, रामेश्वर राऊत, दादासाहेब बिक्कड, सचिन राऊत, पत्रकार विजय बिक्कड, पांडुरंग कसबे यांच्या सह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



वडवणी - लोकनेते सुंदरराव सोळंके सहकारी साखर कारखाना लि, सुंदरनगर येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करतेवेळी महाराजांच्या प्रतिमेचे पुजन करून विनम्र अभिवादन करताना सचिव सुरेश लगड, दासराव मोरे, भागवतराव वगरे, नागोराव निर्मळ, अशोकराव पाटील, गनेश सोळंके, दत्तात्रय शेवाळे, नितिन सोळंके इत्यादी

## लिपिक वर्गीय कर्मचारी संघटनेच्या तालूका अध्यक्षपदी दत्तात्रय ढाकणे

केज दि १९ (प्रतिनिधी)- केज तालुका लिपिक वर्गीय कर्मचारी संघटनेच्या झालेल्या बैठकीमध्ये तालुका अध्यक्षपदी दत्तात्रय ढाकणे यांची निवड करण्यात आली. यावेळी इतर पदाधिकाऱ्यांच्या देखील निवडी करण्यात आल्या या निवडीनंतर विड झालेल्या पदाधिकाऱ्यावर कर्मचारी वर्गातून अभिनंदन केले जाऊ लागले आहे.

यासंदर्भात माहिती अशी की ,महाराष्ट्र शासकीय, निम शासकीय अधिकारी व कर्मचारी संघटनेची बैठक श्रीमती शेप एस. एस. सहाय्यक प्रशासन अधिकारी पंचायत समिती केज यांच्या अध्यक्षतेखाली होऊन यावेळी केज तालुका लिपिक वर्गीय कर्मचारी कार्यकारिणीची निवड करण्यात आली आहे. यामध्ये तालुकाध्यक्ष दत्तात्रय ढाकणे व तालुका उपाध्यक्ष रामराव पवार तसेच सचिव रासवे ज्ञानेश्वर व कोषाध्यक्ष शेख आर. के. आणि तालुका संघटक नानजकर एस.एस. तालुका महिला सचिव श्रीमती बनकर एस.डी तालुकासल्लागार श्रीमती शेप एस.एस.व ढोकर एम.एस तालुका संपर्क प्रमुख बेंदरे सचिन, तालुका प्रसिद्धी प्रमुख



मासुमदार एस.बी. वरील प्रमाणे सर्वानुमते केज तालुका कार्यकारिणीची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

## संपादक 'इकबाल शेख' यांच्या निवडीचे कोठारी प्रतिष्ठानच्या वतीने स्वागत

जामखेड दि १९- अखिल भारतीय डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटनेच्या महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षपदी, अहिल्यानगर येथील एनटीव्ही मराठी न्यूज चॅनलचे मुख्य संपादक इकबाल शेख यांची निवड करण्यात आली आहे. कोल्हापूर येथे संघटनेचे केंद्रीय अध्यक्ष राजा माने यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या राज्य कार्यकारिणीच्या बैठकीत हा महत्त्वपूर्ण निर्णय एकमताने घेण्यात आला. इकबाल शेख यांच्या निवडीमुळे डिजिटल मीडिया क्षेत्रातील पत्रकारांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे.

# संपादकीय

## सकारात्मक विचार करुन परीक्षा द्या

फेब्रुवारी मार्च महिना म्हटलं की परीक्षांचा हंगाम. दरवर्षी याच दोन महिन्यात परीक्षा होतात. दहावी बारावी या बोर्डाच्या परीक्षाही याच काळात असतात. इतकेच काय तर शिष्यवृत्ती, नवोदय यासारख्या स्पर्धा परीक्षाही याच काळात होतात. इयत्ता ५ वि आणि ८ वी च्या शिष्यवृत्ती परीक्षा २२ फेब्रुवारी रोजी आहे. दहावीची बोर्ड परीक्षा आजपासून म्हणजे २० फेब्रुवारी पासून सुरू होत असून ती १८ मार्च पर्यंत असणार आहे. बारावीची परीक्षाही १० फेब्रुवारी रोजी सुरू झाली असून ती ११ मार्च पर्यंत चालणार आहे. या परीक्षा म्हणजे विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील मैलाचा दगड असतो. विद्यार्थ्यांच्या आयुष्याला कलाटणी देणाऱ्या या परीक्षा असतात म्हणूनच या परीक्षा विद्यार्थ्यांच्या जीवनात अतिशय महत्वाच्या असतात. दहावी – बारावीची बोर्ड परीक्षा म्हणजे विद्यार्थी आणि पालकांसाठी कमालीचे टेन्शन. करियरच्या दृष्टीने आणि पुढील अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी बोर्ड परीक्षेच्या गुणांना खूप महत्व असते. त्यामुळे विद्यार्थी वर्षभर भरपूर अभ्यास करत असतात. पण प्रत्यक्ष जेंव्हा परीक्षा जवळ येते तेंव्हा मात्र विद्यार्थ्यांचे टेन्शन वाढते. ते साहजिकच असले तरी या काळात विद्यार्थ्यांनी टेन्शन फ्री राहणे महत्वाचे आहे कारण नकारात्मक विचार घेऊन जर विद्यार्थी परीक्षेला गेला तर त्याचा विपरीत परिणाम होऊन वर्षभर केलेल्या मेहनतीवर पाणी पडू शकते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी परीक्षा कालावधीत प्रसन्न रहावे. सतत अभ्यास करण्याऐवजी मध्येमध्ये ब्रेक घेऊन थोडा वेळ टीव्ही पाहणे, संगीत ऐकणे, लहान मुलांशी खेळणे, बाहेर फिरून येणे, मित्रांशी अभ्यासाव्यतिरिक्त इतरही विषयांशी चर्चा करणे, गप्पा मारणे, चित्र काढणे, आवडती पुस्तके वाचणे अशा गोष्टी कराव्यात. रात्री जागरण करणे टाळावे. विद्यार्थ्यांनी परीक्षा कालावधीत मोबाईलपासून दूरच राहावे. वेळेवर झोपून वेळेवर उठावे. अभ्यासाचा खूप ताण आल्यास विश्रांती घ्यावी. या काळात शक्यतो बाहेर खाणे टाळावे. घरी बनवलेले जेवण वेळेवर करावे. पालकांनीही याकाळात सकारात्मक राहावे. आपल्या पाल्यांवर अभ्यासासाठी दबाव आणू नये. त्याला सतत परीक्षेची आठवण करून देऊ नये. त्याच्याशी हसून खेळून प्रेमाणे वागावे. पालकांनी स्वतःही परीक्षेचे टेन्शन घेऊ नये आणि मुलांनाही देऊ नये. जर विद्यार्थी परिक्षेचे टेन्शन न घेता सकारात्मक विचार घेऊन परीक्षेला गेला तर यश निश्चित मिळेल. दहावी बारावीच्या परीक्षा आयुष्यातील महत्वाचा टप्पा असला तरी शेवटचा टप्पा नाही त्यामुळे टेन्शन फ्री राहा. मन शांत ठेवून प्रश्नपत्रिका सोडवा. यश नक्की मिळेल. सर्व विद्यार्थी मित्रांना या बोर्ड परीक्षांसाठी मनापासून शुभेच्छा! ऑल दि बेस्ट.....!!

# सर्व शिक्षकांना समान सवलत देण्याबाबतचा तत्काळ पूरक आदेश निर्गमित करण्याची कास्ट्राईबची मागणी

माजलगाव दि १९ (प्रतिनिधी)– पवित्र रमजान महिना दिनांक १९ फेब्रुवारी पासून होत असून या पार्श्वभूमीवर उर्दू माध्यम शाळा (जि.प./खाजगी) सकाळ सत्रात भरविण्याबाबत शिक्षणाधिकारी (प्रा)जिल्हा परिषद बीड यांच्याकडून सर्व गटशिक्षणाधिकारी यांना आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.सदर निर्णयाचे महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघ यांनी स्वागत केले असले,तरी माध्यमापुरती मर्यादा घालण्यात आल्याबाबत महासंघाने चिंता व्यक्त केली आहे.

महासंघाच्या वतीने,शिक्षणाधिकारी (प्रा) जिल्हा परिषद बीड यांना दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की,पवित्र सण रमजान हा सर्व मुस्लिम बांधवांकडून श्रद्धेने पाळला जाणारा धार्मिक आचार असून मराठी व इतर माध्यम शाळांमध्ये कार्यरत असलेले मुस्लिम शिक्षक देखील रोजा पाळत अध्यापन कार्य करीत असतात.अशा परिस्थितीत माध्यमाच्या आधारे सवलत मर्यादित ठेवणे ही बाब घटनात्मक समतेच्या तत्त्वाशी विसंगत ठरू शकते. महासंघाने भारतीय राज्यघटनेतील कलम १४ (कायद्यापुढे समानता),कलम १५(धर्माच्या आधारावर भेदभावास मनाई)व कलम २५ (धर्मस्वातंत्र्याचा हक्क) यांचा उल्लेख करत प्रशासनाने भेदभावरहित व समताधिष्ठित भूमिका घेणे आवश्यक असल्याचे नमूद केले आहे.तसेच Right of Children to Free and Compulsory Education Act,2009 अंतर्गत शालेय व्यवस्थापन करताना शिक्षकांच्या कार्यक्षमतेचा व कल्याणाचा विचार करणे अपेक्षित असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.याबाबत संघटनेने शिक्षणाधिकारी (प्रा) यांना निवेदन सादर करून,पवित्र सन रमजान कालावधीत मराठी व इतर माध्यम शाळांतील मुस्लिम शिक्षकांना सकाळ सत्राची सुविधा किंवा वेळ सवलत देण्याबाबत तात्काळ पूरक आदेश निर्गमित करण्याची मागणी केली आहे. महासंघाच्या वतीने तालुकाध्यक्ष राहुल टाकणखार जिल्हा संघटन प्रमुख भारत टाकणखार जिल्हा उपाध्यक्ष वसंत टाकणखार तसेच तालुका कार्यकारणी पदाधिकारी अभिमन्यू इबीते,आजीमुद्दीन खतीब,शेख मतीन,सय्यद आयुब,निलेश गावडे,हनुमंत पांढरपोटे,रवी आदमाने,शिवाजी भाळशंकर,प्रतिक स्वामी, प्रवीण जाधव,राजेंद्र सातपुते,रमेश लव्हाळे,किरण शिंदे, नारायण भाळशंकर,किरण माने,राजकुमार सोनवणे, कृष्णा हौसरमल, ना.मा. पडलवाड, अविनाश येळबकर, सुमेध घाडगे, धोंडीराम रामूळे, जीवन डोंगरे, शंकर पवार,गोविंद पवार, अमोल राऊत,राहुल खुणे, नितीन पुटवाड,गणेश भदर्गे,विजय वैराग्य, आदीनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

## शिवजयंती निमित्त श्रीकांत नवलेंनी केली स्वखर्चाने केली जि.प.शाळेची



बीड दि १९(प्रतिनिधी)–जनतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्मोत्सवा निमित्त पारगाव (सिरस) येथे जिल्हा उपाध्यक्ष राष्ट्रवादी कॉंग्रेस युवा श्रीकांत (नाना ) जयदत्त नवले यांनी गावातील जिल्हा परिषद शाळेला पूर्ण रंगरंगोटीचे काम शिवजयंती निमित्त केले व शाळेच्या बाह्य परिसरात वृक्ष लागवड व गावातील प्रत्येक मुलीच्या लग्नात मोफत पाण्याचे टँकरचे उद्घाटन करण्यात आले .

इतर समाज उपयोगी उपक्रम घेऊन शिवजयंती मोठ्या उत्साहात पारगाव (सिरस ) येथे साजरी करण्यात आली.त्या प्रसंगी गावातील सर्व ग्रामस्थ शिक्षक वृंद मित्रपरिवार उपस्थित होते.या आधी श्रीकांत (नाना) नवले यांनी गावातील लोकांसाठी त्यांच्या वाढदिवसानिमित्त मोफत म्बुलन्स देण्यात आली होती . हे गावकरी लोकांनी सांगितले यापुढे असे समाज उपयोगी उपक्रम राबवत असे राष्ट्रवादी जिल्हा उपाध्यक्ष काँग्रेस युवक श्रीकांत (नाना ) नवले यांनी सुद्धा सांगितल

## मोठेवाडी येथील अखंड हरिनाम सप्ताहात आज सौ.सुनिताताई आंधळे यांचे किर्तन



माजलगाव दि १९( प्रतिनिधी)– तालुक्यातील मोठेवाडी येथे गेल्या चार दिवसापासुन सुरू असलेल्या लाल हनुमान मंदिरातील अखंड हरिनाम सप्ताहात राष्ट्रीय कीर्तनकार सौ. सुनिताताई आंधळे पुणे संस्थापक श्री संत भगवानबाबा मुलींची वारकरी संस्था आळंदी देवाची यांची दि.२० फेब्रुवारी शुक्रवार रोजी सहाव्या दिवसाची कीर्तन सेवा होणार असुन पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी या किर्तन श्रवणाचा आवश्य लाभ घ्यावा असे आव्हान अशोक मामा रासवे यांनी केले आहे. मोठेवाडी येथील लाल हनुमान मंदिरात महाशिवरात्र व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त दि.१३ फेब्रुवारी रविवार पासून सुरु असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहात काकडा भजन, शिवलिला ग्रंथ पारायण,जगदत गुरू तुकाराम महाराज गाथा भजन, श्री हभप.भागवताचार्य बाळु महाराज ऊगले यांच्या मधुरमय वाणीतून भागवत ज्ञान यज्ञ सोहळा होत आहे, तबला साथ मृदुंग महामेरू मनोहर म. थोरे, संगीत साथ निवृती म. शिंदे,महादेव म.कसपटे हे करत आहेत. सांय.हरिपाठ व रात्री ९ ते ११ हभप जनाई म.कोकाटे, हभप संगीताताई म. कोरडे, हभप भागचंद्र म.झांजे, हभप पंकज म.थोरे यांची किर्तन रुपी सेवा संपन्न झाली आहे. तर हभप शिवदास म.जंगले(शास्त्री), हभप.सौ.सुनिताताई म. आंधळे, हभप.केशव म.उखळीकर यांची हरी किर्तने होणार आहेत. दि.२१ फेब्रुवारी शनिवार रोजी रात्री१० वाजता रंगीत संगीत भारूडाचा कार्यक्रम होईल.दि.२२ फेब्रुवारी रविवार रोजी ११ते १:०० श्री. ह.भ.प.रामकृष्ण महाराज रंदवे (बापु) यांचे काल्याचे किर्तन होईल व नंतर महाप्रसाद होईल तरी पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी किर्तन श्रवणाचा व महाप्रसादाचा आवश्य लाभ घ्यावा असे आवाहन समस्त ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले.

## गुरुवर्य भगवान महाराज सार्वजनिक वाचनालयात शिवजयंती उत्साहात

बीड दि १९ (प्रतिनिधी)– गुरूवर्य भगवान महाराज सार्वजनिक वाचनालय इंद्रप्रस्थ कॉलनी बीड व श्रीसंत भगवानबाबा व श्रीसंत वामनभाऊ प्रतिष्ठान इंद्रप्रस्थ कॉलनी बीडच्या संयुक्त विद्यमाने वाचनालय येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्तव्याख्यान व ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. प्रमुख अतिथी यांनीछत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले यावेळी व्याख्याते फारूख मणियार यांचे छत्रपती शिवाजी महाराज या विषयावरील व्याख्यानाने संपन्न झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुहास पाटील होते.यावेळी प्रमुखअतिथी नगरसेवक राजेंद्र गुजर, नगरसेवक आयुबभाई,नगरसेवक माम्मु गुत्तेदार, लोकशाही पत्रकार संघाचे अध्यक्ष भागवत वैद्य,समर्थ सर्जेराव तांदळे हे उपस्थित होते.या कार्यक्रमाला शिक्षक संघाचे डी जी तांदळे,वाचनालयाचे संस्थापक डॉ राजेंद्र भाऊ सानप,ए जी नागरगोजे, एम डी पांचाळ,राजेंद्र घोलप,आर के भोंडवे, बाजीराव ढाकणे,नसिर पटेल, वसंतराव सानप,डॉ जगन्नाथ कांबळे, शिवलिंग घोंगडे,दिगांबर कुंडलकर, उत्तम दोडके,आश्रुबा नागरगोजे, मुखीदखान,ग मा शहाणे,वाय एस भोंडवे, धनंजय सानप,पाबळे काका, बाळासाहेब कांबळे,एच आर सानप यासहअसंख्य वाचक उपस्थित होते.

## माजलगाव येथे बौद्ध धम्मप्रचारकांचा रविवारी जिल्हास्तरीय गौरव सोहळा

माजलगाव, दि.१९(प्रतिनिधी)–जनकल्याण बहुउद्देशीय सेवाभावी संस्था व सातकर्णी युवक संघ, माजलगाव यांच्या संयुक्त विद्यमाने धम्मप्रचारक, बौद्धाचार्य व समता सैनिकांचा जिल्हास्तरीय सोहळा रविवार, दि. २२ फेब्रुवा २०२६ रोजी सकाळी १०.३० वा. श्रावस्ती बौद्ध विहार, केसापुरी कॅम्प, माजलगाव येथे आयोजित करण्यात आला आहे.महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला सद्धम्माचा आदर्श घराघरात आणि मनामनात पोहोचवण्यास अविरत कार्य करणाऱ्या आंबेडकर [illegible] योद्ध्यांचा यावेळी यथोचित सन्मान करण्यात येणार आहे. बीड जिल्ह्यातील ११ तालुक्यांतील सक्रिय बौद्ध विहार, धम्मप्रचारक, बौद्धाचार्य तसेच समता सैनिक दलाच्या कार्यकर्त्यांचा जाहीर सत्कार या कार्यक्रमात होणार आहे.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी व प्रमुख मार्गदर्शक म्हणून आयु. भास्करराव भोजने (अध्यक्ष, विद्वत सभा, महाराष्ट्र राज्य, अकोला) उपस्थित राहणार आहेत. प्रमुख वक्ते म्हणून प्रा. श्रीकिशन मोरे (सहयोगी प्राध्यापक, माणिकचंद पहाडे विधी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर) मार्गदर्शन करणार आहेत. कार्यक्रमाचे उद्घाटन प्रदीप भोगले (सहाय्यक आयुक्त, सामाजिक न्याय विभाग, बीड) यांच्या हस्ते होणार असून स्वागताध्यक्ष म्हणून भारत तांगडे (संस्थापक, जनकल्याण बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, बीड) कार्यभार सांभाळणार आहेत.या गौरव सोहळ्यास बीड जिल्ह्यातील बौद्ध बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सातकर्णी युवक संघाचे रविकांत उघडे, बाबासाहेब जाधव, अशोक कांबळे, संपादक सुहास बोराडे, लक्ष्मण जाधव व इंजी. बिभीषण उघडे यांनी केले आहे.



माजलगाव – शहर पोलिस निरीक्षक राहूल सुर्यतळ यांचे मार्गदर्शना खाली शहर पोलिस स्टेशन येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती मोठ्या उत्साहात साजरी करतांना अधिकारी आणि महिला व पुरुष पोलीस आणि गृहरक्षक दलाचे प्लांटून कमांडर बी जी कुलथे सोबत महिला व पुरुष जवान.

## पात्रुडमध्ये रांगोळीच्या माध्यमातून अवतरले शिवराय रंजना आणि सुरेखा यादव यांची अनोखी मानवंदना

माजलगाव दि १९ (प्रतिनिधी)– तालुक्यातील पात्रुड येथे शिवजयंतीचा उत्साह ओसंडून वाहत असतानाच, रंजना यादव आणि सुरेखा यादव या तरुणींनी आपल्या कलेच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराजांना आगळीवेगळी मानवंदना दिली . अत्यंत आकर्षक आणि जिवंत



वाटणारी महाराजांची प्रतिकृती त्यांनी रांगोळीच्या माध्यमातून साकारली असून, परिसरातील नागरिकांकडून या दोघींच्या कलेचे मोठे कौतुक होत आहे. अंजली किराणा आणि जनरल स्टोअर्सच्या समोर साकारण्यात आलेली ही भव्य रांगोळी पाहण्यासाठी ग्रामस्थांनी मोठी गर्दी केली होती. शिवजयंतीच्या निमित्ताने केवळ मिरवणुकांवर भर न देता, अशा प्रकारे सर्जनशील पद्धतीने महाराजांचा आदर व्यक्त करण्याचा या तरुणींचा प्रयत्न प्रेरणादायी ठरत आहे. अत्यंत सूक्ष्म बारकाव्यांसह रेखाटलेली ही कलाकृती पात्रुड गावातील मुख्य आकर्षणाचे केंद्र ठरली आहे. यादव भगिनींच्या या उपक्रमाचे संपूर्ण माजलगाव तालुक्यात कौतुक होत असून, सोशल मिडियावरही या रांगोळीचे फोटो मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत.

## बाजीराव (दादा) चव्हाण व शेतकरी राजा सामाजिक समितीकडून ऊसतोड कामगारांना मोफत किराणा किट



बीड दि १९ (प्रतिनिधी)– छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९६ व्या जयंतीनिमित्त गुरुवार दि १९ फेब्रुवारी रोजी धर्मवीर प्रतिष्ठान, तसेच शेतकरी राजा सामाजिक समिती यांच्यामार्फत बीड शहरातील, व जरुड गावातील ऊसतोड कामगार व गरजूंना छत्रपती शिवरायांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून १०१ किराणा किटचे मोफत वाटप करण्यात आले.

बीड शहरांत व जवळील जरूड गावातील ऊसतोड कामगार यांना करण्यात आले. जयंतीनिमित्त व्यर्थ खर्च टाळून गरजूंना मोफत किराणा किट साहित्य वाटप करून बीड मध्ये ही एक आगळीवेगळी शिवजयंती साजरी करण्यात आली आहे. शिवरायांच्या जयंतीनिमित्त बीड शहरातील तसेच जरूड गावातील ऊसतोड कामगार, व शेतातील गरजूंना १०१ मोफत किराणा किटचे वाटप करण्यात आले आहे. बाजीराव (दादा) चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली हा स्तुत्यपूर्ण आदर्श उपक्रम राबवण्यात आला. कार्यक्रमा वेळी रोहित धुरंधरे, अशोक सोनवणे, प्रवीण पालीमकर, अशोक (दादा) ढोले पाटील, प्रकाश तावरे, सातिराम आण्णा ढोले पाटील,जलदुत राजेश काकडे,जरुडचे उप सरपंच पंजाबराव काकडे , अशोक दातवासे, कलाकार अशोक लोकरे,युवा नेते गणेश शिंदे,तसेच धर्मवीर प्रतिष्ठान, व शेतकरी राजा सामाजिक समितीचे,व सातिराम आण्णा ढोले पाटील सामाजिक फाउंडेशन महाराष्ट्र राज्य बीड समस्त पदाधिकारी आणि कार्यकर्ते व गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नवगण राजुरीच्या गजानन विद्यालयात शिवजयंती साजरी



नवगण राजुरी दि. १९ (प्रतिनिधी)– येथील गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९६वी जयंती साजरी करण्यात आली.गुरुवार दि१९फेब्रुवारी रोजी शिवजयंती निमित्त छत्रपती शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन प्राचार्य प्रशांत पवळ यांच्या हस्ते करण्यात आले त्यानंतर त्यांनी शिवजयंती निमित्त सर्वांना शुभेच्छा दिल्या. यावेळी उपमुख्याध्यापक शिंदे एस. एस. पर्यवेक्षक दगडे व्ही. एन, शेख एस. वाय, भोसले बी. एस, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी, उपस्थित होते.

## रविवारी मासिक शास्त्रीय संगीत सभा

अंबाजोगाई दि १९ (प्रतिनिधी)– संगीत साधना मंच अंबाजोगाई आणि बालगंधर्व संगीत महाविद्यालय अंबाजोगाई यांच्या वतीने आयोजित २४ वी मासिक शास्त्रीय संगीत सभा रविवार दिनांक २२ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ०६ वाजता नियोजित करण्यात आली आहे.

श्री कपिल गणेश मंदिर आदर्श कॉलनी येथे आयोजित या सभेमध्ये लातूर येथील प्रसिद्ध गायक श्री हरीश कुलकर्णी यांची गायन सेवा होणार आहे. त्यांना जयप्रकाश हरिदास हे तबल्यावर तर श्री विश्वजीत धाट हे संवादिनीवर संगत करतील. तसेच या सभेमध्ये कुमारी स्नेहा सिंनगारे यांना संगीत विशारद प्राविण्यासाठी तर चिरंजीव रुपेश जाधव यांना शैक्षणिक गुणवत्तेसाठी पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येईल. सायंकाळी ६ वाजता होणाऱ्या या संगीत सभेचा सर्व संगीत साधक आणि रसिकांनी अवश्य लाभ घ्यावा असे नम्र आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात येत आहे.

## द लिटल फ्लॉवर स्कूल या शाळेत शिवजयंती साजरी

[illegible] दि. १९ (प्रतिनिधी) :– द लिटल फ्लावर स्कूल या शाळेत छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९६ वी जयंती मोठया उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी पत्रकार सखाराम शिंदे, राजेंद्र सुतार सर, लाड साहेब यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पूजन केले. प्री प्रायमरीतील विद्यार्थ्यांनी कोणी मावळ्यांची, कोणी शिवाजी महाराजांची तर कोणी आई जिजाऊ माँ साहेबांची वेशभूषा परिधान केली होती. काही विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जिवन चरित्रावर बोबडे बोलात दोन शब्द भाषणेही केले. विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या शिवगीतावर नृत्यही सादर केले. यावेळी शाळेतील शिक्षिका श्रीमती



गीतांजली राख, श्रीमती ललिता मेहता, कुलकर्णी मिस, श्रीमती जाधव या उपस्थित होत्या.



माजलगाव – येथील कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करताना कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव हरिभाऊ सवणे, समवेत सह.सचिव रवींद्र नाईकनवरे,लेखापाल उद्धव फपाळ, कोषापाल मीनानाथ मुळे, निरीक्षक सुनील सवणे, प्रतवारीकार अतुल होके,नाईक शेख रहीम व सर्व कर्मचारी बांधव.

# रेणुकाई प्राथमिक शाळेच्या वतीने जयंती निमित्त शिवरायांना मानवंदना



बीड दि १९(प्रतिनिधी) – शिवजन्मोत्सवा निमित्त शिवतीर्थ बीड येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.जन्मोत्सवाचे औचित्य साधून दिनकरराव कदम यांच्या मार्गदर्शनाखाली रेणुकाई शिशु विहार/प्राथमिक शाळा,धांडे नगर/बलगुजार बीड.या शाळेच्या वतीने शिवतीर्थावर *गड आला पण सिंह गेला या नाटिकेचे बहारदार सादरीकरण करुन शिवरायांना मानवंदना देण्यात आली.

याप्रसंगी गेवराई विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय विद्यमान आ.मा.श्री.विजयसिंहराजे पंडित साहेब,बीड नगरीचे उपनगराध्यक्ष मा.श्री.विनोदजी मुळूक, गटनेते फारुकजी पटेल, नगरसेवक महेश धांडे, अशोक भाऊ हिंगे इतर मान्यवर व शिवभक्तांनी तसेच उपस्थित पालकांनी या नाटिकेतील बालकलाकारांचे कौतुक करून शिवजन्मोत्सवाच्या सर्व बीडकरांना शुभेच्छा देत सर्व शिक्षकांच्या पाठीवर कौतुकाची थाप दिली.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले.

## डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटनेच्या प्रदेश उपाध्यक्षपदी 'इकबाल शेख' यांची निवड

जामखेड दि १९(प्रतीनिधी) – राज्य कार्यकारिणी बैठकीत एनटीव्ही न्यूजचे संपादक इकबाल शेख यांची डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटनेच्या प्रदेश उपाध्यक्षपदी निवड करण्यात आल्याने त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

शेख यांच्या २८ वर्षांच्या प्रदीर्घ पत्रकारितेचा अनुभव असून याची दखल घेऊन कोल्हापूर येथे संघटनेचे केंद्रीय अध्यक्ष राजा माने यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या राज्य कार्यकारिणीच्या बैठकीत हा महत्त्वपूर्ण निर्णय एकमताने घेण्यात आला. इकबाल शेख यांनी या संघटनेच्या विस्तारासाठी आणि मजबुतीसाठी मोठे योगदान दिले असून, त्यांच्या संघटनात्मक कौशल्याची दखल घेत ही नवी जबाबदारी त्यांच्यावर सोपवण्यात आली आहे.

इकबाल शेख यांची प्रदेश उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल इकबाल शेख यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल कोठारी प्रतिष्ठानचे अध्यक्ष आणि जैन कॉन्फरन्स चे राष्ट्रीय कार्यकारणी सदस्य संजय कोठारी यांनी अभिनंदन केले.

# भिगवण येथील मुलीच्या अपहरणाचा निषेध

## प्रकरणाची चौकशी करून समाज कंटकांवर कठोर कारवाई करा

## माजलगावात सकल समाजाची पोलिसांकडे मागणी

माजलगाव(प्रतिनिधी) : भिगवण येथे कटरपंती जिहाद्यांकडुन शिवाजी महाराजांच्या जयंतीच्या पूर्वसंध्येला हिंदू समाजाच्या मुलीला भर रस्त्यातून मोटारसायकलवर जात असतांना आई व भावाच्या डोळ्यात मिरची पावडर टाकुन अपहरण केलेल्या घटनेचा निषेध करत या प्रकरणाची सखल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी अशी मागणी सकल हिंदु समाजाच्या वतीने शहर पोलिस प्रशासनाकडे निवेदनाव्दारे करण्यात आली आहे.



दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, कट्टरपंती जिहाद्यांकडून छत्रपती शिवाजी महाराजांचा जयंतीचा पूर्वसंध्येला हिंदू समाजाच्या मुलीला भर रस्त्यातून मोटरसायकलवर जात असताना आई व भावाच्या डोळ्यात मिरची पावडर टाकून आपहरन केले आहे या घटनेचा माजलगाव हिंदू समाजाच्या वतीने जाहीर निषेध करण्यात येतो व या प्रकरणाची सकल चौकशी करून दोषींवर कठोरात कठोर कार्यवाही करावी, भर दिवसा घडलेली ही घटना प्रशासनाच्या कायद्याचा व स्त्रियांच्या संरक्षणाबद्दल खूप मोठा प्रश्न निर्माण करणारे आहे. ? सदरील घटनेमुळे महिलांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झालेले आहे, भर दिवसा रस्त्यावरून जर गाडी अडून अशाप्रकारे अपहरण शिवछत्रपतींच्या महाराष्ट्रात होत असेल तर महाराष्ट्रात महिला सुरक्षित आहेत का हा फार मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे, तरी प्रशासनाने सदरील घटनेची लवकरात लवकर तपासणी करून योग्य ती कारवाई करून कठोर शिक्षा करावी अशी मागणी सकल हिंदु समाजाच्या वतीने शहर पोलिस प्रशासनाकडे निवेदनाव्दारे करण्यात आली आहे.

निवेदनावर भाजपाचे नेते ज्ञानेश्वर मेंडके, अरूण राउत, उपसभापती श्रीहरी मोरे, शिवसेनेचे तालुकाप्रमुख तुकाराम येवले,अविनाश कांढुरे, विशाल देवकते, मनोज कोरडे, रामप्रसाद सावंत, अजिंक्य गायके, अशोक तिडके, ज्ञानेश्वर सरवदे, राजेश जाधव राम आबुज, अतुल उगले, सतीश जोशी, शरद कचरे, प्रल्हाद दळवी संतोष देवकते पवन मोगरेकर भागवत गायकवाड पंडित भुतकर सुभाष साळवे, अजय बादाडे, संतोष जाधव, सुभाष कांबळे, नानासाहेब घोडके, रमेश जाधव, दिपक मेंडके, दीपक अलकुंटे दत्ता महाजन, पुरूषोत्तम गायकवाड, मयुर वाघमारे, सुनिल होके,यशराज जगताप तात्या पांचाळ, शेख फोरोज यांचेसह अनेक समाजाबांधवांच्या स्वाक्ष-या आहेत.

# तलवाडयात छत्रपती शिवाजी महाराज पुतळा लोकार्पण सोहळा व जयंती उत्साहात साजरी

गेवराई दि.१९ (प्रतिनिधी) : गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात बसवलेल्या अश्वारूढ पुतळयाचा लोकार्पण सोहळा व जयंती मोठया उत्साहात साजरी करण्यात आली. जयंती उत्सव समितीचे तरूण पदाधिकारी यांनी अतिशय दिमाखदार स्वरूपात लोकार्पण सोहळा व जयंती उत्सव कार्यक्रमाचे आयोजन केले होते. गुरूवारी सकाळी मान्यवरांच्या उपस्थितीत व सपोनि मनोज निलंगेकर यांच्या शुभहस्ते आरती व प्रतिमा पूजन करून जयंती साजरी करण्यात आली. तसेच

प्राथमिक आरोग्य केंद्र, पोलिस ठाणे, शाळा-महाविद्यालय,ग्रामपंचायत कार्यालय तलवाडा आदी ठिकाणी छत्रपती शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. महाराष्ट्राच्या इतिहासात छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव म्हणजे पराक्रम, दूरदृष्टी, न्यायप्रियता आणि लोकाभिमुख राज्यकारभाराचे तेजस्वी प्रतीक होय असे मौलिक विचार अनेकांनी व्यक्त केले. छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती हा केवळ उत्सव नसून प्रेरणेचा आणि आत्मपरिक्षणाचा दिवस आहे. त्यांच्या आदर्शाचा वारसा जपून समाजकारण, राष्ट्रकारण आणि मानवतेच्या सेवेसाठी काम करणे हिच खरी शिवजयंती आहे असे सपोनि मनोज निलंगेकर यांनी बोलताना सांगितले. तलवाडा गावात ठिकठिकाणी संपन्न झालेल्या शिवजयंती कार्यक्रमास सर्व जाती-धर्मातील कार्यकर्ते, पदाधिकारी, तरूण युवक व शाळकरी मुले - मुली मोठया संख्येने उपस्थित होते.

# शिवजन्मोत्सवानिमित्त सह्याद्री प्रतिष्ठानच्या शिबिरात ५१ जणांचे रक्तदान



माजलगाव (प्रतिनिधी) : शिवजन्मोत्सवानिमित्त सह्याद्री प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून एकूण ५१ जणांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. दरवर्षी शिवजयंतीनिमित्त विविध सामाजिक, सांस्कृतिक व जनजागृतीपर उपक्रम राबविणाऱ्या प्रतिष्ठानने यंदा रक्तदानासारखा मानवतावादी उपक्रम हाती घेतला.

यावर्षी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या अपघाती निधनामुळे शिवजयंती साध्या पद्धतीने साजरी करण्याचा निर्णय आयोजकांनी घेतला. पारंपरिक मिरवणुका व जल्लोष टाळून समाजोपयोगी उपक्रम राबविण्यावर भर देण्यात आला. त्यानुसार छत्रपती संभाजी महाराज चौक येथे सकाळी ११ वाजता रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या शिबिराचे उद्घाटन लोकनेते सुंदर सोळंके सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन जयसिंग सोळंके यांच्या हस्ते करण्यात आले. आपल्या मनोगतात त्यांनी रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान असून अशा उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक संदेश जातो, असे सांगितले. यावेळी दैनिक कार्यारंभचे संपादक शिवाजीराव रांजवण, ज्ञानेश्वर मेंडके यांच्यासह अनेक मान्यवर व नागरिक उपस्थित होते. रक्तदात्यांमध्ये युवकांचा मोठा सहभाग दिसून आला. शिबिरात सहभागी झालेल्या रक्तदात्यांचे आयोजकांच्या वतीने प्रमाणपत्र देऊन अभिनंदन करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रतिष्ठानचे अध्यक्ष नवनाथ गायकवाड, कार्याध्यक्ष दिलीप झगडे,उपाध्यक्ष नारायण शेजुळ व सर्व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. सामाजिक जाणीव जपणारा हा उपक्रम नागरिकांच्या सहकार्यामुळे यशस्वी ठरला.

# संत भगवानबाबा प्रतिष्ठानवर शनिवारपासून भव्य अखंड हरीनाम सप्ताह

## नामांकित प्रवचनकार, कीर्तनकार हजेरी लावणार

बीड दि.१९ (प्रतिनिधी): येथील श्रीसंत भगवानबाबा सामाजिक प्रतिष्ठान'वर प्रतिवर्षाप्रमाणे शनिवार दि. २१ फेब्रुवारी २०२६ पासून सर्वधर्म समभाव अखंड हरिनाम सप्ताहाचे करण्यात आले आहे. या सप्ताहात भजन, प्रवचन, हरिपाठ, कीर्तन आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. सप्ताहात नामांकित आणि प्रबोधनकार कीर्तनकारांची सेवा होणार आहे.

शनिवार दिनांक २१ फेब्रुवारी रोजी ह.भ.प. अंगद महाराज मोरे, नगरबाई गदळे यांचे प्रवचन तर रात्री सायंकाळी ६.३० ते ते ८.३० वेळात हिंदूभूषण ह.भ प. सुनीताताई आंधळे, आळंदी यांचे कीर्तन होणार आहे. रविवार दि.२२ रोजी ह.भ.प. त्र्यंबक महाराज मातकर सर, व ह.भ. प. मारुती घुले सर, केज यांचे प्रवचन , सायंकाळी ह.भ.प. महादेव महाराज चाकरवाडीकर यांचे कीर्तन, सोमवार दि. २३ फेब्रुवारी व ह भ प रामानंद महाराज पुरी व ह.भ.प.उषाताई महाराज मुंडे यांचे प्रवचन, सायंकाळी ह.भ प .रामगिरी महाराज शास्त्री, मठाधिपती येळेश्वर संस्थान, येळी यांचे कीर्तन, मंगळवार दिनांक २४ फेब्रुवारी ह.भ.प. श्रीमंत महाराज तांदळे व ह.भ.प. बाबुराव महाराज मुंडे यांचे प्रवचन तर ह.भ.प. सविताताई महाराज, केकान, झी टॉकीज फेम, बुलढाणा यांचे कीर्तन, बुधवार दि. २५ रोजी ह.भ.प. परशुराम महाराज मराडे यांचे प्रवचन तर ह.भ.प. हनुमान महाराज शास्त्री, महंत शालसिद्ध बाबा संस्थान मिडसांगवी यांचे कीर्तन, गुरुवार दिनांक २६ रोजी महामंडलेश्वर शिवरुद्रानंद महाराज यांचे प्रवचन तर ह.भ.प. तुकाराम महाराज मुंडे शास्त्री, भागवत कथाकार, परळी यांचे कीर्तन. शुक्रवार दि. २७ फेब्रुवारी रोजी ह.भ.प. मोहन महाराज खरमाटे यांची प्रवचन तर ह.भ.प. रामकृष्ण महाराज रंधवे मठाधिपती, विठ्ठलगड संस्थान, पाटोदा यांची कीर्तन होणार आहे. शनिवार दि. २८ रोजी सकाळी ११.०० ते १.०० या वेळात ह.भ.प. भगवान महाराज राजपूत, मठाधिपती राजा हरिश्चंद्र संस्थान, हरिश्चंद्र पिंपरी यांचे काल्याचे किर्तन होणार आहे. कीर्तनानंतर निमंत्रित मान्यवरांच्या सत्कार सन्मान व त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. श्रीसंत भगवानबाबा सामाजिक प्रतिष्ठानवर आयोजित सर्व कार्यक्रमाचा भाविकांनी मोठ्या संख्येने भाग घ्यावा असे आवाहन सप्ताह समितीच्या वतीने करण्यात आले आहे.




वडवणी - संचलित वैष्णवी महाविद्यालयांमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी करतेवेळी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना संस्थेचे सचिव प्रा.डॉ.रणजित बन्सीधरराव मस्के पाटील तर यावेळी उपस्थित महाविद्यालयाचे प्राचार्य दत्ता वसंत सरवदे व इतर

# चिंचोलीमाळी येथे छत्रपती शिवरायांना अभिवादन



चिंचोली माळी (प्रतिनिधी) : केज तालुक्यातील चिंचोलीमाळी येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त गुरूवार (दि.१९ ) सकाळी १० वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौकात भाजपाचे जिल्हा सचिव सुनीलआबा गलांडे पाटील, राम मेजर राऊत,चेअरमन अरुण तात्या काळे, माजी उपसरपंच जितेंद्र देशमुख, जयदत्त गलांडे यांच्यासह शिवभक्तांनी पुष्पहार घालून अभिवादन केले.

यावेळी ग्रामपंचायत सदस्य सुरज गायकवाड,अजिज शेख, बालाजी राऊत, राम गलांडे,संजय नखाते माजी सरपंच भगवानराव काळे, दगडु दळवे, दिलीपराव गायकवाड, राजाभाऊ नखाते, रविंद्र गलांडे, मुख्याध्यापक संजय गलांडे,राजाभाऊ उत्तमराव नखाते, राहुल नखाते,अमर नखाते, रविकुमार गायकवाड, चंद्रकांत भुजबळ, नितीन गलांडे, अजय काळे, चंद्रकांत शिंदे, संजय गलांडे, राजाभाऊ मोटे, अतुल गायकवाड, अभिजित नखाते, विराट देशमुख, अविनाश बजगुडे, अमोल बजगुडे,अजय बोर्डे,तेजस गायकवाड,शंकर काळे, अजय नखाते, ओम निंगुळे, गोविंद गायकवाड, संदिप शिंदे, कृष्णा यादव, रमेश नखाते, गजानन कटके, ऋषी डोरले, वैभव बोर्डे, आतिष नखाते, विशाल काळे, विजय गाडे, भैरव हुंबे, शाम हुंबे, राम बर्डे, ऋषिकेश गिरी संदिप शितोळे, रंजीत नखाते, अशोक बजगुडे,राम गलांडे यांच्या सह तरुण व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी छत्रपती शिवाजी महाराज चौक, महात्मा ज्योतिबा फुले चौक, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज चौक, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक येथेही अभिवादन करण्यात आले.

# सफदर अली देशमुख राष्ट्रीय विद्यालय पेंडगाव येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी



बीड दि.१९ (प्रतिनिधी):- पेंडगाव येथील स.अ.दे राष्ट्रीय विद्यालय मध्ये छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी करण्यात आली या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती येवले ए बी प्रमुख पाहुणे गावचे सरपंच सोमीनाथ पवार,उपसरपंच चंद्रकांत कोसले,माजी सरपंच कल्याण दादा गाडे,माजी सरपंच लक्ष्मण गाडे, माजी सरपंच रामभाऊ काळकुटे,माजी पंचायत समिती सदस्य किशोर आप्पा काळकुटे, ग्रामपंचायत सदस्य नागनाथ धट,सेवा सोसायटी चेअरमन सुखदेव धट,माजी सेवा सोसायटी चेअरमन दत्तात्रय धट,माझी शालेय समिती अध्यक्ष चंद्रकेतू धट,गावातील प्रतिष्ठित नागरिक सुरेश गाडे,कचरू डोंगरे, वडमारे, अध्यक्ष व प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले यावेळी आठवीची विद्यार्थिनी अंकिता पवार छत्रपती शिवाजी महाराज यांची शिव वंदना गायली तसेच वर्ग आठवी मधून अनुष्का गाडे, अंकिता पवार छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर भाषण केले त्यानंतर डोळस सिद्धी व अंकिता पवार यांनी सुंदर असा पोवाड्याचे गायन केले, वर्ग नववी तील गीता घोलप, प्रणाली गोळेकर आणि अदिती शिंदे यांनी शिवजन्माचा पाळणा गायला यावेळी शाळेतील शिक्षक श्री पुराणिक सर, धारकर सर, कोकाटे सर,चादर सर,गाडे सर,नसीर मामा, शैलेश रणखांब व मोठ्या संख्येने गावातील प्रतिष्ठित नागरिक व शाळेतील विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.

# शिवजयंती निमित्त आयडीबीआय बँकेने दिले तीन वस्तीशाळेच्या विद्यार्थ्यांसाठी बाकडे



केज दि. १९ (प्रतिनिधी)– येथील आयडीबीआय बँक शाखेच्या वतीने शिवजयंती दिनी केज तालुक्यातील बोबडेवाडी, पारधी वस्ती, आणि हनुमान वस्ती या ३ प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना वर्गात बसण्यासाठी १ लाख रुपये खर्च करून ३१ बाकडे देण्यात आले. अध्यक्ष स्थानी बनसारोळा शाखेचे शाखा व्यवस्थापक दीपक कोल्हे होते.

शिवजयंतीच्या पावन दिनी गुरूवारी सकाळी ११ वाजता बोबडेवाडी येथील जि प प्राथमिक शाळेत शिवजयंती साजरी करण्यात आली. यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून त्यांना आदरांजली वाहण्यात आली. त्यानंतर आयडीबीआय बँकेच्या केज शाखेच्या वतीने बँकेला मिळालेल्या नफ्यातील काही भाग सामाजिक उपक्रमासाठी खर्च करून बोबडेवाडी प्राथमिक शाळा, पारधी वस्ती व हनुमान वस्ती या ३ शाळेतील विद्यार्थ्यांना शाळेतील वर्गखोलीत बसण्यासाठी १ लाख रुपयाचे ३१ बाकडे केंद्रप्रमुख अर्जुन बोराडे यांच्याकडे यावेळी सुपूर्द करण्यात आले.प्रास्ताविक शाखा व्यवस्थापक सौरभ आगलावे यांनी केले. यावेळी बनसारोळा शाखेचे शाखा व्यवस्थापक दीपक कोल्हे, सहाय्यक व्यवस्थापक देवेश अभ्यंकर,कनिष्ठ सहाय्यक योगेश चव्हाण, केंद्र प्रमुख अर्जुन बोराडे, यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी सहाय्यक व्यवस्थापक रिचा अभ्यंकर, पल्लवी गायकवाड, सुनिल दहिभाते, मुख्याध्यापक वाळके, देशमुख,गणेश आदमाने, सत्यप्रेम बोबडे, विठ्ठल बोबडे, सुभाष बोबडे, वंदना गुट्टे, सुरेखा लोंढे (बचूटे), मोहन बोबडे, भैरवनाथ बोबडे, गोरोबा बोबडे,हजर होते. सूत्रसंचलन किशोर भालेराव यांनी तर आभार मोहन बोबडे यांनी मानले. यावेळी शिक्षक, विद्यार्थी व ग्रामस्थ हजर होते.

# अनाथ-वृद्धाश्रम भेटीतून आदित्यच्या विद्यार्थ्यांना सामाजिक जाणीवेचे धडे




बीड (प्रतिनिधी)-आदित्य औषधशास्त्र महाविद्यालय येथील विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमातील सामाजिक बांधिलकी उपक्रमांतर्गत लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब वृद्धाश्रम, घाटसावळी येथे भेट देत सामाजिक संवेदनशीलतेचा जिवंत अनुभव घेतला.५० विद्यार्थ्यांनी अनाथ-वृद्धाश्रम भेटीतून सामाजिक जाणीवेचे धडे मिळाले.

अभ्यासक्रमानुसार अनाथ/ वृद्धाश्रम भेट देणे अनिवार्य असून,विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, सार्वजनिक विकासाची भावना आणि समाजासाठी कार्य करण्याची प्रेरणा निर्माण व्हावी हा या उपक्रमामागील उद्देश आहे. दि.१४ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत झालेल्या या भेटीत ५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांशी संवाद साधत त्यांच्या जीवनप्रवासाची माहिती जाणून घेतली. तसेच कडधान्ये व फळांचे वाटप करून सामाजिक कर्तव्याची जाणीव प्रत्यक्ष कृतीतून व्यक्त केली. वृद्धाश्रमाचे संचालक व समाजसेवक चंद्रकांत सर यांनी समाजाशी नाळ जोडून काम करण्याचे महत्त्व स्पष्ट केले. डॉ. कुमार सुरवसे यांनी अनाथ व वृद्धांच्या समस्या, त्यांच्या जीवनातील संघर्ष आणि समाजाने त्यांच्याप्रती असलेली जबाबदारी यावर सखोल मार्गदर्शन केले. अनाथ व वृद्धाश्रम भेट ही केवळ अभ्यासक्रमाची औपचारिकता नसून, विद्यार्थ्यांमध्ये मानवतेचे मूल्य रुजवणारा उपक्रम असल्याचे या संदर्भात मत व्यक्त करताना डॉ अदिती सारडा यांनी म्हटले.

# पार्श्वभूमी

दि.२० फेब्रुवारी २०२६ शुक्रवार




## गौतम आठवले यांचे निधन



गेवराई दि.१९ (प्रतिनिधी) :- तलवाडा येथील माजी पं.स.सदस्य - बाबासाहेब चुडामण आठवले यांचे बंधू गौतम चुडामण आठवले यांचे अल्पशा आजाराने उपचारादरम्यान अचानक निधन झाले असून त्यांच्या पार्थिवावर गुरूवारी दुपारी शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. तलवाडा ग्रामपंचायतीचे ते कर्मचारी होते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक पान २ वर

## सौ.सुमित्रा प्रदीप पांडे यांचे निधन



बीड दि १९ (प्रतिनिधी) - शहरातील आदर्श कॉलनी परिसरातील रहिवासी सौ. सुमित्रा प्रदीप पांडे (वय ६०) यांचे दि. १९ फेब्रुवारी २०२६ रोजी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. अत्यंत मनमिळाऊ व प्रेमळ स्वभावामुळे सुमित्रा ताई पांडे यांची परिसरात विशेष ओळख होती. त्यांच्या निधनाने आदर्श कॉलनी परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.त्यांच्या पश्चात पती प्रदीप रामनारायण पांडे, पान २ वर

### आ.सुरेश धस आणि मनोज जरांगे पाटील यांच्या उपस्थितीत शिवजयंती मिरवणुकीत जल्लोष

# छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयघोषाने दुमदुमली पाटोदा नगरी

पाटोदा दि.१९(महेश बेदरे):- महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त पाटोदा शहरात भव्य मिरवणूक उत्साहात पार पडली. मिरवणुकीदरम्यान आ.सुरेश धस यांनी ढोल-ताशांच्या गजरात तसेच मै हु डॉन या गाण्यावर ठेका धरत जल्लोषात सहभाग नोंदविला, तर मराठा संघर्षाचे नेते मनोज जरांगे पाटील हे रात्री उशिरा मिरवणुकीत सहभागी झाले असून छत्रपती शिवाजी महाराज चौकात शिवरायांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यामुळे संपूर्ण वातावरण अधिकच भारावून गेले. सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीच्या वतीने मागील काही दिवस विविध समाजोपयोगी उपक्रम, सांस्कृतिक कार्यक्रम व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. गुरुवारी सायंकाळी छत्रपती शिवाजी महाराज चौकातून मिरवणुकीस प्रारंभ झाला. हजारो शिवप्रेमींच्या उपस्थितीत शहर भगव्या रंगात न्हाऊन निघाले. अश्वारूढ शिवरायांचा पुतळा, भव्य ढोल पथक, उंट व घोड्यांचे पथक, हत्तीवरील अंबारी तसेच इंदौर येथील विशेष डमरू वादन पथकाने मिरवणुकीत रंग भरला. आष्टी-पाटोदा-शिरूर मतदारसंघाचे आमदार सुरेश धस यांनी स्वतः मिरवणुकीत सहभागी होत कार्यकर्त्यांसह मनसोक्त थिरकत उत्सवाचा आनंद लुटला. उत्सव समितीचे अध्यक्ष संतोष जाधव यांच्यासह हजारो शिवप्रेमी नागरिक या सोहळ्यात सहभागी झाले होते. संत बाळू देव महाराज विद्यालयातील विद्यार्थ्यांनी शिवरायांच्या वेशभूषेत सहभाग नोंदवून मिरवणुकीत वेगळे आकर्षण निर्माण केले. महिलावर्गाने भगवे फेटे परिधान करून मोठ्या संख्येने सहभाग घेतला. जय भवानी, जय शिवाजीच्या घोषणांनी शहर दणाणून गेले. तत्पूर्वी सकाळी शिवाजी महाराज चौकात प्रतिमापूजनाचा कार्यक्रम पार पडला. ह.भ.प. सतीश महाराज उरणकर, ह.भ.प. रामकृष्ण रंधवे बापू महाराज, केशव महाराज जगदाळे, पान २ वर





## स्वयंभू श्री महादेव मंदिर श्रीक्षेत्र शेळकेवाडी (पि) येथील सप्ताहाची सांगता

शिरूर कासार दि.१९(प्रतिक भांडेकर):- प्रतिवर्षी प्रमाणे स्वामी अमृता आश्रम श्री क्षेत्र शेळकेवाडी ता. मुळशी जि. पुणे या ठिकाणी भव्य सप्ताहाचे आयोजन अमृत महाराज जोशी यांच्या आशीर्वादाने करण्यात आले होते. श्रीक्षेत्र शेळकेवाडी या ठिकाणी स्वयंभू महादेव मंदिर असल्याने येथे महाशिवरात्रीनिमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात येते .स्वामी अमृताश्रम मठाचे मठाधिपती ,महामंडलेश्वर अमृत महाराज जोशी यांच्या काल्याच्या कीर्तनाने दि.१७ फेब्रुवारी रोजी मंगळवारी सांगता झाली यावेळी ह भ प पंडित महाराज क्षीरसागर, मधुकर शेळके, गोरख शेळके, नवनाथ शेळके यांच्यासह परिसरातिल भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सप्ताहामध्ये दररोज काकडा भजन ,ज्ञानेश्वरी पारायण, हरिपाठ ,रात्री कीर्तन व हरिजागर असे कार्यक्रम असल्याने मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते.हभप.अक्षय महाराज पिंगळे बीड,हभप,ओमकार महाराज दुडे आळंदी, साध्वी वैष्णोदेवी दिदी, हभप.पुरुषोत्तम महाराज पाटील आळंदी, हभप.संतोषानंद शास्त्री वृंदावन, ह भ प निवृत्ती महाराज बोरकर आळंदी, आचार्य गणेश महाराज शिंदे किल्ले शिवनेरी, या नामवंत कीर्तनकारानी हजेरी लावून श्रोत्याना मंत्रमुग्ध केले .शेवटी काल्याच्या कीर्तनाची सेवा बीड जिल्ह्यातील नवगण राजुरीचे भूमिपुत्र सुमधुरवाणीतून अमृताचा वर्षाव करणारे महाराष्ट्रातील दिग्गज कीर्तनकार अनृताश्रम स्वामी महाराज ( अमृत महाराज जोशी ) यांच्या काल्याच्या कीर्तनाने सांगता झाली.अमृताश्रम स्वामी महाराज गेल्या १६ वर्ष पासून श्रीक्षेत्र शेळकेवाडी येथे वास्तव्यास आहेत. या ठिकानी त्यांचा आश्रम असून त्यांना या आश्रमासाठी भुमी बाबाजी शेळके पान २ वर

# आता अल्पवयीन मुलाच्या कमरेलाही पिस्तूल स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली कारवाई

बीड दि १९ (प्रतिनिधी)- बीड छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त सुरू असलेल्या बंदोबस्ता दरम्यान बीड येथील स्थानिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई केली. कंबरेला गावठी कट्टा ( पिस्तूल) लावून फिरणाऱ्या एका विधीसंघर्ष बालकास ताब्यात घेतले आहे. बीड जिल्ह्यामध्ये मागील काही महिन्यापासून रिवाल्वर आढळून येत असून या रिवाल्वर कोण विक्री करत किंवा कुठून आणल्या जातात याची सखोल तपासणी करण्याची नितांत गरज आहे.

यासंदर्भात माहिती अशी की गुरुवार दिनांक १९१९ फेब्रुवारी २०२६ रोजी बंदोबस्तावर असताना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला माहिती मिळाली की, एक विधीसंघर्ष बालक कंबरेला गावठी बनावटीचा कट्टा लावून माने कॉम्प्लेक्स परिसरात थांबलेला आहे. मिळालेल्या खात्रीशीर माहितीच्या आधारे पथकाने तात्काळ घटनास्थळी धाव घेत छापा टाकला. या कारवाईत संबंधित विधीसंघर्ष बालकास ताब्यात घेण्यात आले असून त्याच्याकडून एक गावठी बनावटीचा कट्टा जप्त करण्यात आला आहे. त्यानंतर त्यास पुढील कारवाईसाठी शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या स्वाधीन करण्यात आले.या प्रकरणी शिवाजीनगर पान २ वर



# शिवरायांचे विचार वारंवार समाजासमोर आणणे गरजेचे-कृष्णा रामदासी

बीड (प्रतिनिधी) - स्वा. सावरकर शैक्षणिक संकुलात छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी कार्यक्रमाचे मुख्य वक्ते प्रा. कृष्णा रामदासी यांनी आपले विचार व्यक्त करताना शिवरायांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. ते म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार ही केवळ इतिहासाची पाने नसून ती वर्तमानासाठी जगण्याची शिदोरी आहे. आजच्या काळात नीतिमत्ता आणि शौर्याची जोपासना करण्यासाठी शिवचरित्र वारंवार समाजासमोर आणले पाहिजे. जो समाज आपला इतिहास विसरतो, तो आपले भविष्य घडवू शकत नाही. त्यामुळे प्रत्येक पिढीने शिवरायांचे व्यवस्थापन कौशल्य, त्यांचा रयतेप्रती असलेला दृष्टिकोन आणि त्यांचे धाडस पान २ वर




## आरोग्य विभागातील सेवानिवृत्तीधारकांचे प्रलंबीत प्रकरणे निकाली काढावेत पेन्शन अदालत बैठकीत संघटनेची मागणी



बीड दि.१९ (प्रतिनिधी) :-जिल्हा आरोग्य विभागाने डॉ.शेख रौफ यांचे अध्यक्षतेखाली १७ फेब्रुवारी रोजी पेन्शन अदालत बैठकीचे आयोजन करुन पेन्शनरच्या प्रलंबीत प्रकरणावर पेन्शन अदालत बैठक घेण्यात आली. सदरच्या बैठकीस डॉ.शेख रौफ व कनिष्ठ प्रशासन अधिकारी राहूल कांबळे आणी बैठक विभागाचे प्रमुख श्रीमती सुलभा फासे आणी महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेचे *राज्य अध्यक्ष शेख वजीर व राज्य सदस्य पी.एल.कुलकर्णी जिल्हाध्यक्ष हनीफखान पठाण सल्लागार मोहन निराळे जिल्हा उपाध्यक्ष पान २ वर

## नेकनूर येथील मूकबधिर शाळेवर शिवजयंती साजरी



नेकनूर दि १९(प्रतिनिधी)-बीड तालुक्यातील नेकनूर येथील मूकबधिर शाळेत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरा करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष मूकबधिर शाळेचे मुख्याध्यापक लुचारे सर हे उपस्थित होते . प्रमुख पाहुणे राखुंडे सर हे उपस्थित होते सर्व मान्यवरांच्या हस्ते शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी बोलताना मासाहेब जिजाऊंनी संस्कार केले म्हणून शिवाजी महाराज घडले आणि त्यांनी स्वराज्य घडवले. पान २ वर

# शेतकऱ्यांची जाण असल्यामुळे माझ्या संस्थेला 'शेतकरी शिक्षण संस्था' असे नाव दिले-माजी आ.भीमराव धोंडे

## संतांच्या साक्षीने डॉ.स्वामीनाथन कृषी प्रदर्शनाचे उद्घाटन



आष्टी(प्रतिनिधी):- शिवजयंती निमित्त आयोजित मराठवाड्यातील सर्वात मोठ्या डॉ. स्वामीनाथन कृषी प्रदर्शन चे उद्घाटन संत-महंतांच्या आशीर्वादाने आणि मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडले. सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त अश्वारूढ पुतळ्याचे पूजन करण्यात आले. त्यानंतर प्रवेशद्वारावर नारळ वाढवून व फित कापून औपचारिक उद्घाटन करण्यात येवून महादेव मूर्तीचे पूजन व नारळ वाढवून मान्यवरांचे व्यासपिठावर आगमन झाले. व्यासपिठावर स्व. अजितदादा पवार यांच्या प्रतिमेला पुष्प वाहून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार भीमराव धोंडे होते. प्रारंभी अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी संदिप माने यांच्या मार्गदर्शनाखाली स्वागतगीत व राज्यगीत सादर केले. स्व. अजित दादा पवार यांना दोन मिनिटे उभे राहून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.यावेळी निमंत्रक सौ. दमयंतीताई धोंडे, अजय दादा धोंडे, अभयराजे धोंडे, राजू काका धोंडे व प्राचार्य डॉ. श्रीराम आरसूळ यांनी अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांचा सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.या प्रसंगी माजी आ. भीमराव धोंडे, माजी आ. बाळासाहेब आजबे, माजी आ. जनार्दन तात्या तुपे, मा. शिक्षण सभापती नियामत बेग, महंत विठ्ठल महाराज गहिनाथगडकर, ह.भ.प. रामकृष्ण रंधवे बापू, ह.भ.प. आदिनाथ महाराज आंधळे, ह.भ.प. विष्णु महाराज लिंबोडीकर, ह.भ.प. बालाजी महाराज, ह.भ.प. शिंदे महाराज, ह.भ.प. दिनकर महाराज तांदळे, कृषी आयुक्त सुनीलदादा चव्हाण, सुशीलाताई मोराळे, डॉ. शिवाजी राऊत, सौ. दमयंतीताई धोंडे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी साळवे, उपविभागीय कृषी अधिकारी उद्धव गर्जे, तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे, धैर्यशील थोरवे, रामराव खेडकर, लालाभाऊ कुमकर, पांडुरंग नागरगोजे, अशोक साळवे, पान २ वर

## पालवण गावात मध्यरात्री बसवला छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा

बीड(प्रतिनिधी)अखंड हिंदुस्तानचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज, यांची काल ३६९ वी जयंती काल साजरी झाली, त्या निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. परंतु सर्वात महत्वाचा आणि महाराजांच्या विषयी खरे प्रेम दाखवणारा उपक्रम बीडच्या पालवण या गावच्या मावळ्यांनी राबवला. त्यासाठी नियोजनबध्द रणनिती आखण्यात आली, बीड शहरालगत पालवण या गावांमध्ये जिल्हा परिषद शाळेसमोर छत्रपती शिवाजी महाराजांचा हा भव्य दिव्य पुतळा उभा करण्यात आला आहे. तीन महिन्यापासून याची तयारी सुरु होती. २० शिवशंभू भक्त त्यासाठी काम करत होते. रात्री ११ ते रात्री ३ पर्यंत पुतळ्याच्या उभारणीचे काम सुरु होते.ओंकार डुकरे,अमोल शेळके,अभिषेक जठाळ,भगवान मस्के,अशोक मस्के,युवराज मस्के,विजय मस्के,विकास मस्के,आदेश महागोविंद,बाबासाहेब सातपुते,समाधान मस्के,गिरी,सक्षम मस्के,रमेश,घोलप योगेश घोलप,अशा अनेक शंभूभक्तांनी त्यासाठी परिश्रम घेतले.अखंड हिंदुस्तानचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचा भव्य पुतळा पालवण या गावामध्ये उभारावा अशी तमाम शिवभक्तांची इच्छा होती. परंतु आजपर्यंत कोणीही या साठी पुढाकार घेतला नव्हता. मात्र पान २ वर



## आदर्श मित्रमंडळाच्या वतीने शिवजयंती निमित्त ८१ मावळ्यांचे रक्तदान



बीड (प्रतिनिधी):-बीड जिल्हा रुग्णालयात रक्ताची कमतरता जाणवत असल्याने आदर्श मित्र मंडळाने शिवजयंती निमित्त स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. रक्तदान शिबिर आयोजित करून या शिबिरात ८१ मावळ्यांनी रक्तदान करून छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन केले. हिंदवी स्वराज्यांचे संस्थापक श्रीमंत योगी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त शिबिराचे आयोजन करण्यात आले. आदर्श मित्रमंडळाच्या वतीने दि.१९ फेब्रुवारी २०२६ रोजी सर्व मार्गदर्शक व १८ पगड जातीतील सर्व मावळे व आदर्श मित्र मंडळातील ज्येष्ठ लहान थोर सर्व उपस्थित मावळे आणि प्रभाग क्रमांक ७ मधील सर्व नागरिकांनी रक्तदान शिबिरास उस्फुर्त प्रतिसाद दिला.



## पीएम श्री जिल्हा परिषद माध्यमिक शाळा पिंपळनेर या ठिकाणी शिवजयंती साजरी

बीड दि.१९(प्रतिनिधी):-पीएम श्री.जिल्हा परिषद माध्यमिक शाळा पिंपळनेर या ठिकाणी शिवाजी महाराज यांची जयंती विविध कार्यक्रम घेवुन मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. याबाबत अधिक माहिती अशी की, पीएम श्री जिल्हा परिषद माध्यमिक शाळा पिंपळनेर या शाळेमध्ये शिवजयंती निमित्त विविध कार्यक्रम घेण्यात आले. कार्यक्रमा च्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक सुहास साळवे तर प्रमुख पाहुणे म्हणून शाळेतील ज्येष्ठ शिक्षक निळकंठ दत्तात्रय, विजयकुमार जामकर, श्री ससाने शेषराव,श्रीमती दाणी मॅडम, श्रीमती सुपेकर मॅडम या होत्या. सुरुवातीला शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर सहावीच्या वर्गातील मुलींनी सांस्कृतिक गीत सादर केले. त्यानंतर कु.गार्गी गवळी,श्रेया तिळगुळ, सोनाली थोरात, समर्थ घाडगे, ज्ञानेश्वरी सातपुते, दिवटे, वाणी या विद्यार्थ्यांनी भाषणे व गीते सादर केली. प्रस्ताविक श्रीमती गाढवे मॅडम यांनी केले तर सूत्रसंचालन सोनाली पटाईत व मेहेत्रे या दोन मुलींनी केले. यावेळी निळकंठ सर यांनी जय जय महाराष्ट्र माझा हे गीत सादर केले. ससाने सर यांनी शिवाजी महाराजांच्या जीवन कार्यावर पान २ वर



## श्री नारायण मा.व उ.मा.विद्यालयात शिवजयंती उत्साहात साजरी

बीड दि.१९(प्रतिनिधी):-आहेर चिंचोली येथील श्री नारायण मा. व उ. मा. विद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. श्री नारायण विद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष महादेवराव काळे (अण्णा), संस्थेचे सचिव तथा प्राचार्य अमोल काळे सर उपस्थित होते. महादेवराव काळे अण्णा पान २ वर



बचपन इंग्लिश स्कूल येथे शिवजयंती साजरी करताना संचालक राहुल वनवे सह प्राचार्य राजश्री बागलाने मॅडम

CMYK